रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक १२
www.ramprahar.com
# राम प्रहर
सोमवार, २९ जुलै २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## ‘फडणवीसांनी पाठवलं नव्हतं, देशमुखांनीच बोलावलं होतं’



**सांगली** : देशाचे गृहमंत्री अमित शाह आणि तत्कालीन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांना सांगून आपल्यासमोरील अडचणींमध्ये काही मदत होते का, अशी विनंती त्या वेळचे राज्याचे गृहमंत्री अनिल देशमुख यांनी केली होती, असा आरोप समित कदम यांनी केला आहे तसेच मी स्वतःहून अनिल देशमुख यांना भेटायला गेलो नव्हतो, तर देशमुखांनीच मला भेटायला बोलावले होते, त्यामध्ये फडणवीस यांचा संबंध नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. समित कदम हे मिरजेतील जनसुराज्य शक्ती युवा अध्यक्ष असून त्यांच्या नावाचा उल्लेख अनिल देशमुखांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर आरोप करताना केला होता. त्यावर समित कदम यांनी स्पष्टीकरण देत देशमुख यांचे मुद्दे खोडून काढले आहेत. त्यामुळे देशमुखांच्या अडचणीत आणखी वाढ झाल्याचे बोलले जात आहे.

## अंतरंग

तिहेरी हत्याकांडप्रकरणी डॉक्टरला अटक व कोठडी/३
लोकअदालतीमध्ये १२ हजार ३२८ प्रकरणे निकाली/५
खालापूरची तायक्कांडोपटू रिया कदमला सुवर्णपदक/८

# पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताच्या मनू भाकरचा ‘कांस्य’वेध

**पॅरिस : वृत्तसंस्था**

भारताची २२ वर्षीय नेमबाज मनू भाकर हिने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये इतिहास रचला आहे. तिने महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूलच्या अंतिम फेरीत कांस्यपदक जिंकले. यंदाच्या ऑलिम्पिकमधील भारताचे हे पहिले पदक असून देशासाठी ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकणारी मनू ही पहिलीच महिला नेमबाज ठरली आहे. कोरियाच्या नेमबाजांनी सुवर्ण आणि रौप्यपदक जिंकले. मनू ही हरियाणातील झज्जर जिल्ह्यातील गोरिया गावची रहिवासी आहे. २०१८ आयएसएसएफ विश्वचषक स्पर्धेत मनूने दोन सुवर्णपदके जिंकली होती. या स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारी ती सर्वात तरुण भारतीय महिला नेमबाज राहिली आहे. वयाच्या १६व्या वर्षी मनूने २०१८च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत दोन सुवर्णपदके जिंकली. तिच्या पिस्तूलमध्ये बिघाड झाल्यामुळे ती टोकियो ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकू शकली नाही. आता तिने पदक जिंकले आहे. २१ सदस्यीय भारतीय नेमबाजी संघातील ती एकमेव खेळाडू आहे जी अनेक वैयक्तिक स्पर्धांमध्ये भाग घेते. तिच्या यशाला आता ऑलिम्पिक विजयाचे कोंदण मिळाले आहे.



### राष्ट्रपती, पंतप्रधानांकडून कौतुक

भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून ऑलिम्पिक पदक विजेती मनू भाकरचे कौतुक करून अभिनंदन केले आहे. ‘एक ऐतिहासिक पदक... मनू भाकरने भारतासाठी पहिले पदक जिंकून अप्रतिम कामगिरी केली. कांस्यपदक जिंकणाऱ्या मनूचे खूप अभिनंदन. शूटिंगमध्ये पदक जिंकणारी ती पहिली महिला खेळाडू असल्याने तिचे हे यश खूप खास आहे. ती भारतासाठी नेमबाजीत पदक जिंकणारी पहिली महिला ठरली आहे, असे पंतप्रधान मोदींनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

“

**मला खूप छान वाटतंय. मी खूप मेहनत घेतली होती. कांस्यपदक जिंकले असले तरी मला आनंद आहे की, मी देशासाठी जिंकू शकले. कुटुंब, प्रशिक्षक आणि भारतीयांच्या पाठिंब्याबद्दल सर्वांचे आभार!**

**–मनू भाकर**

# यशश्री शिंदेच्या हत्येचा तीव्र निषेध

## उरणमध्ये नागरिक एकवटले; आरोपीच्या अटकेची मागणी



**उरण : बातमीदार, वार्ताहर, प्रतिनिधी**

येथील यशश्री शिंदे या २२ वर्षीय युवतीच्या निर्घृण हत्येच्या निषेधार्थ रविवारी (दि. २८) उरणमध्ये असंख्य नागरिक एकवटले होते. या वेळी भाजप महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ आणि आमदार महेश बालदी यांनी आरोपीला पकडून त्याला फाशीची शिक्षा मिळावी, अशी मागणी पोलिसांसमोर केली तसेच सर्वांनी या घटनेचा तीव्र निषेध केला.

उरण शहरातील मोरा रोड येथे महात्मा गांधी पुतळ्यापाशी घटनेचा निषेध करण्यासाठी सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक संस्था–संघटनांचे प्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने एकत्र आले होते. **(पान २ वर..)**

### नवी मुंबईत अक्षता म्हात्रेसाठी निषेध रॅली

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील बेलापूर येथील अक्षता म्हात्रे या विवाहित महिलेची कल्याण शीळ येथे डोंगरावर असलेल्या मंदिर परिसरात तीन नराधमांनी अत्याचार करून अमानूषपणे हत्या केली होती. या पार्श्वभूमीवर रविवारी (दि. २८) आगरी–कोळी बांधवांनी नवी मुंबईत कोपरखैरणे ते वाशी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक अशी निषेध रॅली काढली होती.

या निषेध रॅलीत आगरी कोळी समाजबांधवांबरोबरच सर्वपक्षीय एकजूटदेखील पहायला मिळाली. नवी मुंबई, उलवे, पनवेल, ठाणे, कल्याण, डोंबिवली, पालघर, उरण, मुंबईतून लोक अक्षता म्हात्रेच्या कुटुंबियांना न्याय मिळावा यासाठी आले होते. रॅलीमुळे दुकाने बंद ठेवण्यात आली होती.

या वेळी आमदार गणेश नाईक यांनी, अक्षताला न्याय मिळवून देण्यासाठी सर्व धर्मांचे, जातीचे, पंथाचे लोक एकत्र आले आहेत. सर्वांच्या भावना तीव्र आहेत. या प्रकरणातील नराधमांना फाशीची शिक्षा झाली पाहिजे. त्यामुळे असे दुष्कृत्य करण्यास समाजात कोणी धजावणार नाही, अशी अपेक्षा व्यक्त केली. **(सविस्तर वृत्त पान २ वर..)**

# अमली पदार्थांविरोधातील लढाईत एक मोठे पाऊल!

### पंतप्रधान मोदींकडून ‘मानस’ची घोषणा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (दि. २८) मन की बात या कार्यक्रमाच्या ११२व्या भागात संबोधित केले. लोकसभा निवडणुकीतील विजयानंतरचा हा दुसरा भाग होता. या वेळी पंतप्रधान मोदींनी संपूर्ण देशासाठी अमली पदार्थांविरोधातील मानस या विशेष मोहिमेचा उल्लेख केला.

पंतप्रधान मोदी म्हणाले, आपला मुलगा अमली पदार्थांच्या आहारी जाऊ नये, असे प्रत्येक कुटुंबाला वाटत असते. आता अशा लोकांना मदत करण्यासाठी सरकारने ‘मानस’ नावाचे एक खास केंद्र सुरू केले आहे. ड्रग्जविरुद्धच्या लढाईतील हे एक मोठे पाऊल आहे. यासाठी सरकारने १९३३ हा एक टोल फ्री क्रमांकदेखील जारी केला आहे. या क्रमांकावर कॉल करून कोणतीही व्यक्ती आवश्यक तो सल्ला घेऊ शकते तसेच ड्रग्जशी संबंधित इतर काही माहिती असेल, तर ती या क्रमांकावर कॉल करून नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोलाही देऊ शकते. येथे सर्व माहिती गोपनीय ठेवली जाते. पंतप्रधान म्हणाले, सर्व जनतेला, कुटुंबांना, संस्थांना माझा आग्रह आहे की, त्यांनी मानस हेल्पलाईनचा पुरेपूर उपयोग करावा.

## निवडक

### दिल्लीत तीन विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू; दोघांना अटक

**नवी दिल्ली** : येथील आयएएस कोचिंग सेंटरच्या तळघरात पाणी शिरल्याने यूपीएससीची तयारी करणाऱ्या तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची घटना शनिवारी रात्री घडली. या प्रकरणी कोचिंग सेंटरच्या मालकासह दोघांना अटक करून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत भारतीय महिला संघाचा पराभव

**दांबुला** : श्रीलंकेच्या महिला क्रिकेट संघाने भारतीय संघाचा पराभव करून पहिल्यांदा आशिया चषक जिंकला. भारताने दिलेले १६६ धावांचे आव्हान त्यांनी आठ विकेट व आठ चेंडू राखून पार केले.

## सी.पी. राधाकृष्णन महाराष्ट्राचे नवे राज्यपाल



**मुंबई : प्रतिनिधी**

ज्येष्ठ भाजप नेते सी.पी. राधाकृष्णन यांची महाराष्ट्राच्या राज्यपालपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ते सध्या झारखंडचे राज्यपाल असून आता महाराष्ट्राचे विद्यमान राज्यपाल रमेश बैस यांची जागा घेतील, तर महाराष्ट्र विधानसभेचे माजी अध्यक्ष आणि भाजपचे वरिष्ठ नेते हरिभाऊ बागडे यांची राजस्थानच्या राज्यपालपदी नियुक्त करण्यात आली आहे.

राष्ट्रपतींनी शनिवारी रात्री १० राज्ये व केंद्रशासित प्रदेशांतील राज्यपालांच्या नियुक्तीची घोषणा केली. महाराष्ट्राच्या राज्यपालपदी नियुक्त करण्यात आलेले राधाकृष्णन तीन दशकांपासून भाजपचे सक्रिय सदस्य आहेत. ते दोन वेळा तमिळनाडूच्या कोईंबतूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार म्हणून निवडून आले होते तसेच त्यांनी काही वर्षे तमिळनाडू भाजपचे प्रदेशाध्यक्ष म्हणूनही काम पाहिलेले आहे.

# विधान परिषदेच्या नवनिर्वाचित आमदारांचा शपथविधी

**मुंबई : प्रतिनिधी**

विधान परिषदेच्या नवनिर्वाचित आमदारांचा रविवारी (दि. २८) शपथविधी पार पडला. परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे या नवनिर्वाचित सदस्यांना शपथ दिली.

या सोहळ्यात आमदार योगेश टिळेकर, पंकजा मुंडे, परिणय फुके, अमित गोरखे, सदाभाऊ खोत, भावना गवळी, कृपाल तुमाने, शिवाजीराव गर्जे, राजेश विटेकर, मिलिंद नार्वेकर, प्रज्ञा सातव या नवनिर्वाचित सदस्यांनी विधान परिषद सदस्यत्वाची शपथ घेतली.

विधान परिषदेच्या ११ जागांसाठी १२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. यामध्ये महाविकास आघाडीतून निवडणूक लढवत असलेले शेकापचे जयंत पाटील यांचा पराभव झाला होता.



## मध्य रेल्वेचा पुणे विभागात ब्लॉक

### ३१ जुलैपर्यंत ६२ रेल्वेगाड्या रद्द

**पुणे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने पुणे विभागातील दौंडमध्ये नॉन इंटरलॉकिंगचे काम करण्यासाठी तीन दिवसांचा ब्लॉक जाहीर केला आहे. त्यामुळे २९ ते ३१ जुलैपर्यंत तब्बल ६२ रेल्वेगाड्या रद्द करण्यात आल्या आहेत, तर अनेक गाड्या पुणे–मिरज–कुर्डूवाडी, गुंताकल–बेल्लारी–हुबळी–मिरज–पुणे आणि मनमाड–इगतपुरी–कल्याण–पनवेल–कर्जत–पुणे–मिरज या मार्गांऐवजी पर्यायी मार्गावर चालवल्या जातील.

सोलापूर–पुणे या मार्गावर नॉन इंटरलॉकिंग व ट्रॅफिक ब्लॉक घेण्यात येणार आहे. त्यामुळे रेल्वेगाड्या बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मध्य रेल्वेच्या पुणे विभागातील दौंड रेल्वेस्थानक, दौंड कार्ड लाईन, दौंड गुड्स यार्ड आणि दौंड ए केबीन दरम्यानहा ब्लॉक घेण्यात येणार आहे.

## बेलापूर इमारत दुर्घटनेप्रकरणी बिल्डर, मालकावर गुन्हा दाखल

**नवी मुंबई** : बेलापूर येथील शाहबाज गावात शनिवारी पहाटे इमारत कोसळून तिघांचा मृत्यू झाला, तर दोन जण गंभीर जखमी झाले. या दुर्घटनेप्रकरणी इमारतीचा विकसक (बिल्डर) तसेच मूळ मालक यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुर्घटनाग्रस्त इंदिरा निवास ही अनधिकृत इमारत दहा वर्षांपूर्वी बांधण्यात आली होती. निकृष्ट दर्जाच्या बांधकामामुळे चार मजली इमारत अचानक कोसळली. पालिकेने या इमारतीला नोटीसही बजावली होती. दुर्घटनेनंतर बिल्डर आणि मूळ मालक यांच्यावर बेलापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केल्याची माहिती महापालिकेकडून देण्यात आली.

# पनवेलमध्ये रंगला बाबुजी महोत्सव

### आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आर्च इंटरप्रायझेस आयोजित सुधीर फडके अर्थात बाबुजी यांच्या लोकप्रियतेचा उच्चांक गाठलेल्या गाण्यांचा स्वरोत्सव बाबुजी महोत्सव शनिवारी (दि. २७) पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयोजित करण्यात आला होता. या महोत्सवाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट दिली.



महोत्सवात सुधीर फडके अर्थात बाबुजी यांनी गायलेली आणि संगीतबद्ध केलेली अजरामर गीते गायक डॉ. जय आजगावकर, मंदार आपटे, अर्चना गोरे आदींनी सादर केली, तर ज्येष्ठ संगीतकार, गायक आणि स्व. सुधीर फडके यांचे पुत्र श्रीधर फडके यांनी विशेष सादरीकरण केले. कार्यक्रमाचे निर्माता विनीत गोरे तसेच सूत्रसंचालक सुकन्या जोशी, श्रेयसी वझे या होत्या.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी महोत्सवाला भेट देत स्व. सुधीर फडके यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले तसेच सर्व कलाकारांचे कौतुक केले. त्यांच्यासमवेत भाजप सांस्कृतिक सेलचे जिल्हा संयोजक अभिषेक पटवर्धन, सहसंयोजक गणेश जगताप, पनवेल शहर संयोजक वैभव बुवा आदी उपस्थित होते.



# नवी मुंबईत अक्षतासाठी जनसागर उसळला

## ■ आरोपींना फाशीची शिक्षा देण्याची एकमुखी मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

बेलापुर येथील अक्षता म्हात्रे या विवाहितेची कल्याण शीळ येथे डोंगरावर असलेल्या घोळ गणपती परिसरात अत्याचार करून अमानुषपणे तिची हत्या झाली होती. अखेर आगरी कोळी बांधवांनी रविवारी (दि.२८) नवी मुंबईत कोपरखैरणे ते वाशी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक असे निषेध रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यात आगरी कोळी समाज बांधवांव्यतिरिक्त सर्वपक्षीय एकजूटदेखील पहायला मिळाली. नवी मुंबई, उलवे, पनवेल, ठाणे, कल्याण, डोंबिवली, पालघर, उरण, मुंबईतून समाजबांधव आले होते.



छत्रपती शिवाजी महाराज चौक वाशी येथे हा निषेध मोर्चा झाला. कोपरखैरणेपासून चालण्यास सुरुवात झाली होती. टप्प्याटप्प्यावर राजकीय नेते रॅलीत सामील होत गेले. रॅलीत कोणतेही विघ्न येऊ नये यासाठी पोलिसांचा बंदोबस्त होता. वाशी, एपीएमसी व कोपरखैरणे या तिन्ही पोलीस ठाण्यातील कर्मचारी अधिकारी बंदोबस्तासाठी होते, तसेच वाहतूक पोलीस देखील होते. जवळपास २५० ते ३०० पोलिसांचा बंदोबस्त रॅली दरम्यान होता. रॅलीमुळे दुकाने बंद ठेवण्यात आली होती, तर पोलीस उपायुक्त पंकज डहाणे हे परिस्थितीवर लक्ष ठेवून होते, तर ठिकठिकाणी समाज बांधवांनी पाण्याच्या बाटल्यांची व्यवस्था करण्यात आली होती.

रॅली काढताना मानवी साखळी करून सुरुवात करण्यात आली होती. वाशी चौकात येईपर्यंत ही साखळी तशीच ठेवण्यात आली होती. या वेळी आमदार गणेश नाईक, शिवसेना उपनेते विजय नाहटा, राजन विचारे, भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक, माजी खासदार संजीव नाईक, अनिल कौशिक, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष नामदेव भगत, मनसेचे शहराध्यक्ष गजानन काळे, चंद्रकांत पाटील, विठ्ठल मोरे, द्वारकानाथ भोईर, सलुजा सुतार, पूनम पाटील तसेच नगरसेवक, नगरसेविका, राजकीय पदाधिकारी उपस्थित होते.

**नराधमांना फाशीवर लटकवा, माझ्या बहिणीला न्याय मिळावा ही इच्छा आहे.**
**–कोमल अगास्कर, अक्षताची बहीण**

**हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावा. त्याचबरोबर या खटल्यात विशेष सरकारी वकील म्हणून अॅड. उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करण्यासाठी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना पत्र देऊन चर्चा केली होती. महासंचालकाकडून नियुक्तीचे पत्र निघाल्यानंतर अॅड. निकम हा खटला हाताळणार आहेत. या प्रकरणातील नराधमांना फाशीची शिक्षा झाली पाहिजे. त्यामुळे असे दुष्कृत्य करण्यास समाजामध्ये कोणीच धजावणार नाही.**
**–गणेश नाईक, आमदार, ऐरोली विधानसभा क्षेत्र**

**या प्रकरणातील नराधमांना फाशी झाल्यानंतरच अक्षता यांना न्याय मिळेल. त्यामुळे असे दुष्कृत्य करण्याचा कोणी विचारही करणार नाही, असा संदेश समाजात जाईल. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार या प्रकरणात विशेष लक्ष ठेवून तपासात कोणत्याही त्रुटी राहता कामा नयेत.**
**संदिप नाईक, जिल्हाध्यक्ष, भाजप, नवी मुंबई**

## तीनदा समन्स बजावूनही पूजा खेडकर जबाब नोंदवण्यास गैरहजर

**पुणे** : जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांच्याविरुद्ध छळवणुकीची तक्रार प्रकरणात प्रशिक्षणार्थी अधिकारी पूजा खेडकर यांना तीनदा समन्स बजावूनही त्या पुणे पोलिसांसमोर हजर झाल्या नाहीत. खेडकर यांच्याशी गेल्या आठवडाभरापासून पोलीस संपर्क साधण्याचा प्रयत्न करीत आहेत, मात्र त्या संपर्कक्षेत्राबाहेर असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिली.

पूजा खेडकर यांनी जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांच्याविरुद्ध वाशिममध्ये छळवणुकीची तक्रार दिली होती. त्या अनुषंगाने खेडकर यांना पुणे पोलिसांकडे जबाब नोंदविण्याचे आदेश देण्यात आले होते. पुणे पोलिसांनी त्यांना दोनदा समन्स बजाविले होते. त्यावेळी खेडकर यांनी पोलिसांकडे अवधी मागितला होता. आठवडाभरानंतर त्या पोलिसांसमोर हजर झाल्या नाहीत. जबाब नोंदविण्यास उपस्थित रहावे, असे समन्स पोलिसांनी त्यांना पुन्हा बजावले. तीनदा समन्स बजावूनही त्या हजर झाल्या नाहीत. खेडेकर यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र त्यांचा मोबाइल क्रमांक संपर्कक्षेत्राबाहेर असल्याची माहिती पोलीस अधिकाऱ्यांनी दिली. दरम्यान जमिनीच्या वादातून शेतकऱ्यांना बंदुकीचा धाक दाखवून जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याच्या दिलीप खेडकर यांना न्यायालयाने ३० हजारांच्या जातमुचलक्यावर अटकपूर्व जामीन मंजूर केला. मनोरमा खेडकर यांच्या जामीन अर्जावर सोमवारी (दि.२९) सुनावणी होणार आहे.

## मेट्रोचे गर्डर वाहून नेणाऱ्या वाहनाचा अपघात

### घोडबंदर मार्गावर मोठी कोंडी

**ठाणे : प्रतिनिधी**

घोडबंदर येथील जुना टोलनाका भागात मेट्रो मार्गिकेचे गर्डर वाहून नेणाऱ्या अतिअवजड वाहनाचा अपघात झाल्याने घोडबंदर मार्गावर मोठी वाहतूक कोंडी झाली. या मार्गावर गायमुख घाट ते वाघबीळपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या. त्यामुळे ठाण्याहून बोरीवली, वसई, गुजरातच्या दिशेने वाहतूक करणाऱ्या चालकांचे आणि प्रवाशांचे हाल झाले. अवघ्या १५ ते २० मिनिटांच्या अंतरासाठी पाऊण तास लागत आहे. शनिवारी मध्यरात्रीपासून ही वाहतूक कोंडी सुरू होती.

घोडबंदर भागात मेट्रो मार्गिकेच्या निर्माणाचे काम सुरू आहे. शनिवारी मध्यरात्री २.४५ वा.च्या सुमारास ठाण्याहून घोडबंदरच्या दिशेने गर्डर वाहून नेणाऱ्या पूलर या वाहनाला जुना टोलनाका येथे अपघात झाला. वाहन अतिअवजड असल्याने दोन्ही मार्गिकेवरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती.

घटनेची माहिती ठाणे वाहतूक पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी दुसऱ्या एका पुलर वाहनाच्या मदतीने अपघातग्रस्त वाहन बाजूला काढण्याचे कार्य सुरू केले. सुमारे तीन तासानंतर हे वाहन रस्त्यावरून बाजूला करण्यात आले.

## मुंबईत स्वाईन फ्लूच्या रुग्णांमध्ये वाढ

**मुंबई : प्रतिनिधी**

पावसाळ्यात डेंग्यू, हिवतापाबरोबरच स्वाईन फ्लूच्या रुग्ण वाढू लागले असून मुंबईत खासगी रुग्णालयांत दररोज साधारणपणे २० ते २५ रुग्ण स्वाईन फ्लूचे आढळून येत असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

मुंबई महानगरपालिकेकडून पावसाळी आजारांना प्रतिबंध करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत. हिवताप व डेंग्यूच्या रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे. त्यापाठोपाठ आता मुंबईमध्ये स्वाईन फ्लूच्या रुग्णांमध्येही वाढ होत आहे. मुंबई महानगरपालिकेने पावसाळी आजारांबाबत १६ जुलै रोजी जाहीर केलेल्या अहवालानुसार मुंबईत स्वाईन फ्लूचे ५३ रुग्ण सापडले होते. ही संख्या तुलनेने कमी वाटत असली तरी मुंबईतील अनेक खासगी रुग्णालये व दवाखान्यांमध्ये स्वाईन फ्लूची लक्षणे असलेले रुग्ण मोठ्या प्रमाणात येत असल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात येत आहे.

मागील काही दिवसांपासून तापाच्या रुग्णांच्या संख्येत वाढ झाली आहे. यातील जवळपास १० ते १२ रुग्णांमध्ये सर्वसामान्य तापाबरोबरच स्वाईन फ्लूची लक्षणेही दिसून येत आहेत. या रुग्णांची रक्त तपासणी केल्याशिवाय नेमके निदान करणे अशक्य असते. त्यामुळे त्यांना तपासणी करण्यास सांगून ज्वरावरील उपचार सुरू केले जातात, असे चेंबूरमधील एका खासगी रुग्णालयात वैद्यकीय सल्लागार असलेले डॉ. राजांशू तिवारी यांनी सांगितले.

तापाच्या रुग्णांमध्ये वाढ झाली असून, या रुग्णांमध्ये स्वाईन फ्लूची लक्षणे दिसून येत आहेत, मात्र तपासण्यांनंतर फार कमी रुग्णांमध्ये स्वाईन फ्लू आढळून आल्याची जे.जे. रुग्णालयातील एका डॉक्टरने दिली.

## महाडमध्ये महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू

**महाड : प्रतिनिधी**

बिरवाडी येथील महिलेचा प्रसुतीच्या एक महिन्यांनतर प्रकृती अस्वास्थ्यामुळे उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना शनिवारी (दि.२७) महाडमधील एका खासगी रुग्णालयात घडली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वीरा वितेश मोरे (२६ रा.बिरवाडी) या महिलेची एक महिन्यापूर्वी कोल्हे नर्सिंग होम येथे प्रसुती झाली होती. शनिवारी अचानक चक्कर आल्याने तिला उपचाराकरिता बिरवाडी येथील स्थानिक डॉक्टरांकडे नेले असता पुढील उपचारासाठी खासगी रुग्णालयात जाण्याचा सल्ला दिला. तेथे महिलेला छातीत दुखू लागणे आणि श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. उपचारादरम्यान या महिलेचा मृत्यू झाला. मृत्यूनंतर महिलेच्या नातेवाईकांनी डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळेच महिलेचा मृत्यू झाल्याचा आरोप करीत काही वेळ गदारोळ केला. पोलिसांच्या मध्यस्तीनंतर वातावरण शांत झाले. महाड शहर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद झाली आहे.

## मापगावमध्ये ५०० बेलरोपांची लागवड

**मुरूड : प्रतिनिधी**

पावसात जास्तीत जास्त वृक्ष लागवड होण्यासाठी वन विभागाचे प्रयत्न सुरू आहेत. वाढते प्रदूषण व पर्यावरणीय संस्थेचा होणारा ऱ्हास कमी करणे ही काळाची गरज आहे. यासाठी वन परीक्षेत्रातील परिमंडळ वन अधिकारी कार्यालय तीनवीरा व पर्यावरण क्षेत्रात अग्रेसर असणारी आगाखान एजन्सी फॉर हॅबिटॅट संस्था मुंबई यांनी संयुक्तरित्या सुमारे ५०० बेलाच्या रोपांची लागवड तालुक्यातील मापगाव पंचायत हद्दीतील कनकेश्वर डोंगरावर नुकतीच केली.




परिमंडळ वन अधिकारी डॉ. निलेश चांदोरकर, तीनवीरा वनरक्षक सुरज सारंगे, संस्थेच्या असोसिएट स्नेहल पाटील, जयेश नागावकर, समृद्धी पाटील अंजली पेडणेकर, शीतल पाटील, अभिजीत वेंगुर्लेकर, विराज बांदिवडेकर व पर्यटक या वृक्षारोपणात सहभागी झाले होते. कार्यक्रमास आगाखान एजन्सी फॉर हॅबिटॅट संस्थेच्या वतीने कार्यक्रम व्यवस्थापिका अमृता पराडकर यांनी मोफत रोपे उपलब्ध करून कार्यक्रमाचे नियोजन केले होते.

## महाराज श्री दक्ष प्रजापती यांची जयंती साजरी

**पनवेल** : प्रजापती समाज विकास मंडळाच्या वतीने रविवारी (दि.२८) चक्रवर्ती सम्राट महाराज श्री दक्ष प्रजापती यांची जयंती पनवेलमध्ये साजरी करण्यात आली. भगवान दक्ष प्रजापती यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी राष्ट्रीय अध्यक्ष सी.पी.प्रजापती, मुख्य महासचिव विनोद प्रजापती, गजेंद्र प्रजापती, ओमप्रकाश प्रजापती, राजेंद्र प्रजापती, विशाल प्रजापती, इंदर प्रजापती, संजय कुंभार, भगवानदास प्रजापती, रोहित प्रजापती, तुफानी प्रजापती, राकेश प्रजापती, शिवनाथ प्रजापती, बडेलाल प्रजापती, सियाराम प्रजापती, संजय प्रजापती, परमेश प्रजापतह आदी उपस्थित होते.



## दुर्मिळ सारस पक्षाचा उपचारादरम्यान मृत्यू

**खालापूर : प्रतिनिधी**

खालापूरातील हाळ गावात एका घराच्या छपरावर सारस पक्षी आढळला होता. पक्षी वरवर पाहता अशक्त दिसत असल्याचे समजताच पक्षी मित्र आणि या क्षेत्रातील अभ्यासक अभिजीत घरत यांनी रेस्क्यू संस्था पुणे यांच्याशी संपर्क साधला. त्या संस्थेचे सदस्य हर्षद हे अॅम्ब्युलन्ससह हाळ गावात दाखलही झाले, मात्र उपचारादरम्यान त्या पक्षाचा मृत्यू झाला.



या पक्षाला पाहण्यासाठी गावकऱ्यांनी मोठी गर्दी केली होती. हर्षद यांनी सुरक्षितपणे त्या पक्षाला ताब्यात घेऊन त्याच्यावर पशुवैद्य विष्णू काळे यांच्यासह प्राथमिक उपचार सुरू केला, मात्र त्या दरम्यान दुर्दैवाने त्या पक्षाचा मृत्यू झाला.

सध्या प्राणी आणि पक्षांचा अधिवास संकुचित होत गेल्याने ते आपल्या खाद्यासाठी मानवी वसाहतीत येत आहेत. सारस हा पक्षी सातत्याने नैसर्गिक बदलांनुसार पर्यटन करीत असतो.

हाळ गावात आढळलेला सारस पक्षी आजारी असल्याने त्याने विश्रांतीसाठी तेथे विसावा घेतल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

पान १ वरुन

## यशश्री शिंदेच्या हत्येचा तीव्र निषेध

निषेध मोर्चा तेथून राजपाल नाका, चारफाटा ते परत राजपाल नाकामार्गे उरण पोलीस ठाणे येथे नेण्यात आला. या मोर्चात पुरुष व युवावर्गासह महिला भगिनींचा सहभाग लक्षणीय होता, तर उरणमधील सर्व व्यापाऱ्यांनीही कडकडीत बंद पाळून यशश्री शिंदेच्या हत्येचा निषेध केला.

या वेळी मोर्चेकऱ्यांनी पोलीस प्रशासनाला तपासाबाबत माहिती विचारली असता उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक राजेंद्र कोते-पाटील यांनी आरोपीचा शोध सुरू असून कोणत्याही अफवेवर विश्वास ठेवू नका. कोणीही कायदा हातात घेऊ नका. यशश्री शिंदेच्या कुटुंबियांना न्याय मिळवून देऊ, असे सांगितले. सहाय्यक पोलीस आयुक्त विशाल नेहूल यांनीही शांतता राखा. आरोपी सापडल्यावर कायदेशीर कारवाई करू, असे आश्वासन दिले.

भाजप महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ म्हणाल्या की, आरोपी कर्नाटकमध्ये पळून गेला आहे. पोलिसांच्या तीन टीम त्याचा माग काढत आहेत. लवकरच हरामखोर पोलिसांच्या ताब्यात असेल, तर आमदार महेश बालदी यांनी, आरोपीला फाशीची शिक्षा व्हावी याकरिता मी कटिबद्ध आहे. यशश्री शिंदेला न्याय मिळालाच पाहिजे. पोलिसांनी आरोपीला पकडून आणण्यासाठी दोन दिवस लागतील असे सांगितले आहे. त्यांना वेळ देऊ आणि जर आरोपीला दोन दिवसांत पकडले नाही, तर बुधवारी निर्णय घेऊन गुरुवारपासून आपण बेमुदत बंद करू, रस्त्यावर बसू. मी तुमचे प्रतिनिधित्व करेन असा शब्द देतो, परंतु लवकरच आरोपी पकडल्याची बातमी मिळेल, असे सांगत जमावाला शांत केले.

पोलीस प्रशासनाने लवकरात लवकर आरोपीला पकडण्याचे व कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिल्याने मोर्चा तात्पुरता स्थगित करण्यात आला.

या वेळी भाजप तालुकाध्यक्ष रवी भोईर, जिल्हा सरचिटणीस चंद्रकांत घरत, चारुशीला घरत, शहराध्यक्ष कौशिक शाह, माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष राणी म्हात्रे, शहराध्यक्ष संपूर्णा थळी, युवा मोर्चा शहराध्यक्ष निलेश पाटील, माजी नगरसेवक राजू ठाकूर, माजी नगरसेविका जान्हवी पंडित, महिला मोर्चा जासई विभाग अध्यक्ष शमिता ठाकूर, हितेश शाह, सुरज ठवळे आदी उपस्थित होते.



## उत्तर-पश्चिम भारतात मान्सूनचा जोर वाढणार

**मुंबई : प्रतिनिधी**

मागील काही दिवसांपासून पश्चिम किनारपट्टीवर मान्सून सक्रिय होता. त्यामुळे पश्चिम किनारपट्टीवर व लगतच्या राज्यात अतिवृष्टीसह मुसळधार पाऊस सुरूच होता. परिणामी काही नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली. त्यामुळे जनजीवन पूर्णतः विस्कळीत झाले आहे.

अनेक भागात पूरपस्थिती निर्माण झाली. दरम्यान हवामान विभागाने पुढील चार ते पाच दिवसांत उत्तर-पश्चिम (वायव्य) भारतात पुन्हा एकदा मान्सून सक्रीय होणार असून मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे.

हवामान विभागाने दिलेल्या बुलेटीनमध्ये म्हटले आहे की, पुढील चार ते पाच दिवसांत उत्तर-पश्चिम भारताच्या बहुतांश भागात सक्रिय मान्सूनची स्थिती आहे. सोमवार (दि.२९) गुजरात, सौराष्ट्र व कच्छ तसेच २८ जुलै ते गुरूवार १ ऑगस्टदरम्यान कोकण, मध्य महाराष्ट्र आणि गोव्यामधील काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यतादेखील हवामान खात्याकडून वर्तविण्यात आली आहे.

## बंदी उठल्याने लोणावळ्यातील भुशी डॅम, टायगर पॉईंटवर गर्दी

**पुणे : प्रतिनिधी**

लोणावळा शहरातील भुशी धरण, टायगर पॉईंटसह भाजे धबधबा व इतर सर्व पर्यटनस्थळांवर रविवारी (दि.२८) पर्यटकांनी मोठी गर्दी केली होती. मागील दोन-तीन दिवसांपासून पावसाचा जोर काहीसा कमी झाल्यामुळे डोंगर भागातून वाहणारे धबधबे व भुशी धरण तसेच भाजे धबधबा येथील पायऱ्यांवरून वाहणारे पाणी यांचा वेगदेखील कमी झाला आहे. या पायऱ्यांवर बसून वर्षाविहाराचा आनंद घेण्यासाठी रविवारच्या सुट्टीचा दिवस सादर मोठ्या प्रमाणात पर्यटक या पर्यटन स्थळांवर दाखल झाले होते.



मागील आठवड्यामध्ये लोणावळा शहर व ग्रामीण भागामध्ये मुसळधार पाऊस झाल्याने या सर्व परिसरामधील जनजीवन विस्कळीत झाले होते. सुरक्षेच्या कारणास्तव सर्व पर्यटन स्थळांवर जाण्यास पर्यटकांना बंदी घालण्यात आली होती. त्यामुळे मागील संपूर्ण आठवडा हा सर्व परिसर पर्यटकांना मुकला होता. आज मात्र रविवारी या सर्व परिणाम स्थळांवर पर्यटकांनी मोठी गर्दी केली होती.

मावळ व मुळशी तालुक्यातील पर्यटनस्थळांवर जाण्यास २५ ते २९ जुलैदरम्यान प्रशासनाने बंदी घातली होती. पावसाचा जोर कमी झाल्याने ही बंदी शनिवारी मध्यरात्रीनंतर उठवली होती. त्यानंतर पुन्हा हवामान विभागाने पुढील चार दिवस पुणे जिल्ह्यात व घाटमाथ्यावर पावसाचा येलो अलर्ट दिल्याने पुन्हा बंदीचा नवीन आदेश प्रांत अधिकारी यांनी लागू केला आहे. दरम्यान रविवारी पावसाचा जोर कमी असल्याने व पर्यटकदेखील मोठ्या संख्येने आल्याने सर्व पर्यटन स्थळांवर पर्यटकांनी वर्षाविहाराचा मनमुराद आनंद घेतला.

धरणावर लोणावळा शहर पोलिसांच्या वतीने मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. तसेच सहारा पुल येथे देखील बंदोबस्त लावण्यात आला आहे. भाजे धबधबा परिसरामध्ये लोणावळा ग्रामीण पोलिसांनी पोलीस बंदोबस्त नियुक्त केला होता तसेच पवना धरणाच्या जलाशय परिसरातदेखील बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

# तिहेरी हत्याकांडाच्या चौकशीअंती डॉक्टरला अटक






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मावळ येथील तिहेरी हत्याकांड प्रकरणी तळेगाव एमआयडीसी पोलिसांनी कळंबोली येथील अमर रुग्णालयाचे मालक आणि पीडितेवर उपचार करणारे डॉ. अर्जुन पोळ यांना अटक केली आहे. डॉ. पोळ यांना ३० जुलैपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्यात आले आहे.

## ३० जुलैपर्यंत पोलीस कोठडी

६ ते ९ जुलै यादरम्यान मावळमध्ये राहणाऱ्या पीडितेला गर्भपातासाठी कळंबोली येथील अमर रुग्णालयात आणले होते. पीडितेसोबत तिचे दोन व पाच वर्षांची बालके होती. पीडितेचा मृत्यू अमर रुग्णलयात झाल्यावर तिच्या प्रियकर आणि त्याच्या साथीदाराने तीचा मृतदेह इंद्रायणी नदीत फेकून दिला होता. बालकांनी त्यांच्या आईला इंद्रायणीत फेकल्याचे पाहून हंबरडा फोडल्याने प्रियकर व त्याच्या साथीदाराने जिवंत बालकांना इंद्रायणीत फेकून दिले होते. या घटनेनंतर पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केल्यानंतर एकापाठोपाठ एक आरोपींना अटक केली.

अमर रुग्णालयातील डॉ. पोळ यांची मागील तीन दिवसांपासून चौकशी सुरू होती. अखेर तळेगाव एमआयडीसी पोलिसांना चौकशीअंती डॉ. पोळ यांना अटक केल्याची माहिती या प्रकरणाचा तपास करणारे सहाय्यक पोलीस निरीक्षक शाम म्हस्के यांनी दिली.

डॉ. पोळ यांनी पीडितेचा उपचारानंतर मृत्यू झाल्याची बाब स्थानिक पोलिसांपासून लपवून ठेवली. पीडितेच्या मृतदेहाचे शवविच्छेदन झाल्यास अनेक बाबी स्पष्ट होऊ नये म्हणून बनाव करण्यात आल्याचा आरोप डॉ. पोळ यांच्यावर करण्यात आला होता. डॉ. पोळ यांना सरकारी वैद्यकीय अधिकारी ते वैद्यकीय अधीक्षक पदापर्यंत सेवेचा अनुभव होता. पनवेल महापालिकेने डॉ. पोळ यांच्या अमर रुग्णालयाची नोंदणी रद्द केली आहे.

पनवेल पालिकेच्या आरोग्य विभागाने चार महिन्यांपूर्वी एका प्रसुतीदरम्यान मातेचा मृत्यू झाल्याने डॉ. पोळ यांना अमर रुग्णालयात एकही नवीन रुग्ण दाखल करू नये याबाबत नोटीस दिली होती. तरीही डॉ. पोळ यांनी मावळच्या पीडितेवर दाखल करून दिवसभर उपचार केले.

# ई-पॉस मशीन बंद असल्याने पनवेलमध्ये रेशन वितरण ठप्प



**खारघर : प्रतिनिधी**

पनवेल तालुक्यात रेशन दुकानातील धान्य वितरण पूर्णपणे ठप्प झाले असल्याने हजारो लाभार्थी शासकीय धान्यापासून वंचित आहेत. पनवेल तालुक्यातील ई-पॉस मशीन नेटवर्क व तांत्रिक अडचणीमुळे बंद असल्याने ही परिस्थिती उद्भवली आहे. याबाबत रास्त भाव धान्य दुकानदार संघटनेने जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना पत्र लिहले आहे.

काही दुकानात जुलै महिन्यातील धान्य पोच झाले नाही. लाभार्थी रेशनकार्डधारकांची गैरसोय होत असून दुकानदारांना दैनंदिन कार्डधारकांच्या रोषाला सामोरे जावे लागत असून दुकानदार अतिशय मानसिक तणावाखाली असल्याचे रास्त भाव संघटनेचे अध्यक्ष भरत पाटील यांनी सांगितले. धान्य ऑफलाईन पद्धतीने वाटप करणे अथवा मुदतवाढ देणे सद्य परिस्थितीमध्ये आवश्यक असताना शासकीय पातळीवर याबाबत कोणताच निर्णय झालेला नाही. या तांत्रिक अडचणींचा परिणाम लाभार्थ्यांना सहन करावा लागत आहे.

ई-पॉस नेटवर्क व तांत्रिक अडचणीमुळे ई-पॉस मशीन व्यवस्थित चालत नाहीत. परिणामी ग्रामीण व शहरी भागातील रास्त भाव धान्य दुकानदार दररोज तालुका व जिल्हा स्तरावर पाठपुरावा करीत आहेत.

पनवेलमध्ये ७० हजारांपेक्षा जास्त दारिद्र्य लाभार्थ्यांना नियमित रेशनच्या धान्यांचा लाभ मिळतो. विशेषतः आदिवासी बांधव गरजू मध्यमवर्गीय यांना याचा फटका बसत आहेत. हातावर पोट असलेले आदिवासी बांधवदेखील रास्त भाव धान्य दुकानावर केवळ खेटे मारत आहेत, मात्र त्यांना धान्य मिळत नाही.

**१६ जुलैपासून राज्यभरातील ई-पॉस मशीन बंद आहेत. पनवेलमध्येदेखील हिच परिस्थिती आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडे याबाबत अहवाल सादर केला आहे.**

**-प्रदीप कांबळे, पुरवठा अधिकारी, पनवेल**

**शासनाने याबाबत लवकरात लवकर निर्णय घ्यावा. ऑफलाईन धान्य वितरित करण्याच्या सूचना दिल्याशिवाय आम्ही धान्य वितरित करू शकत नाही. त्यामुळे लाभार्थ्यांसह खटके उडत आहेत.**

**- भरत पाटील, अध्यक्ष, रास्त भाव धान्य विक्रेते**

# 'स्वप्ननगरी'च्या रहिवाशांनी घेतली आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चिपळे भोकरपाडा येथील स्वप्ननगरी होम्स को. ऑप. सोसायटीतील रहिवाशांसोबत आमदार प्रशांत ठाकूर यांची बैठक रविवारी (दि.२८) आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत रहिवाशांनी त्यांना भेडसावणाऱ्या समस्या आमदार प्रशांत ठाकूर यांच्यापुढे मांडल्या.



## समस्या सोडविण्याची मागणी

स्वप्ननगरी सोसायटीतील रहिवासी गेल्या अनेक दिवसांपासून विविध समस्यांना सामारे जात आहेत. याबाबत रहिवाशांनी रविवारी आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट घेतली. या बैठकीत सर्व रहिवाशांनी त्यांना भेडसावत असलेल्या समस्या आमदार प्रशांत ठाकूर साहेब यांच्याकडे मांडल्या. त्या समस्या समजून घेऊन सोडावल्या जातील असे आश्वासन आमदार प्रशांत ठाकूर यांनी रहिवाशांना दिले.

या बैठकीला माजी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, विभाग अध्यक्ष सुनील पाटील, पनवेल तालुका युवा मोर्चा सरचिटणीस विश्वजीत पाटील, चिपळे माजी उपसरपंच मुकेश फडके, हनुमान फुलोरे, रुपेश फुलोरे, किशोर फुलोरे, भास्कर फुलोरे, कल्पेश फुलोरे, स्वप्ननगरी सोसायटीचे अध्यक्ष गणेश सदमाने, अनिल राय, कुषणा जेधे, अनंता जाधव, अशोक गंधम, चंद्रकांत कदम, शंकर अंकुल, कन्हैया नरकुड्डी, अशोक पास्तम, दामन्ना साखरे, शीतल सूर्यवंशी, समाधान म्हात्रे, नरेंद्र यादव, महेंद्र कुमार, लक्ष्मण घाडगे, संजय तावरे, विनोद सिंग, इंदु पवार आदी उपस्थित होते.

# मारहाण करून सोनसाखळी हिसकावली

**पनवेल : वार्ताहर**


ऑर्केस्ट्रा बारमध्ये नाचत असताना धक्का मारून खुर्चीवर पाडले आणि हाताबुक्क्यांनी मारहाण करून सोन्याची गळ्यातील साखळी हिसकावून नेल्याप्रकरणी निर्मल हरीहर याच्याविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

गणेश गीते हे भवानी पेठ, पुणे येथे राहत असून पुणे महानगरपालिकेत इंजिनिअर म्हणून काम करतात. २० जुलै रोजी गणेश गीते व त्यांचा मित्र कमलेश क्षीरसागर हे दोघे पुणे येथून कोन गाव पनवेल येथे बिंदास आर्केस्ट्रा बारमध्ये गेले होते. त्या ठिकाणी ओळखीचे निर्मल हरीहर, अमित मते, रोहित चव्हाण, सुशील यादव व पिंटू हे देखील बसले होते. या वेळी ते नाचत असताना २१ जुलै रोजी निर्मल हरिहर याने गणेश यांना दोन-तीन वेळा धक्का दिला.

या वेळी धक्का का देतो? असे विचारले असता त्याने जोरात धक्का देऊन खुर्चीवर पाडले व हाताने मारहाण केली. त्या वेळी निर्मल हरीहर याने गळ्यातील दीड तोळे वजनाची चेन हिसकावून घेतली. त्यानंतर गीते हे पुणे येथील घरी निघून गेले व पनवेल तालुका पोलीस ठाण्यात ई-तक्रार केली.



**पनवेल : महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघातर्फे पत्रकार संवाद यात्रा काढण्यात येत आहे. या यात्रेंतर्गत संघातील सदस्यांनी रविवारी भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांची भेट घेतली. या वेळी संघाचे जिल्हा उपाध्यक्ष राकेश खराडे, पनवेल तालुकाध्यक्ष शैलेश चव्हाण, खालापूर उपाध्यक्ष अमोल सांगळे, सदस्य देवा पवार, निनाद चोपडेकर आदी उपस्थित होते.**



**पनवेल : भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात रविवारी तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या उपस्थितीत पदाधिकाऱ्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मन की बात कार्यक्रम अनुभवला. या वेळी भाजप शहर सरचिटणीस विनायक मुंबईकर, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य संजय भगत, अशोक आंबेकर आदी उपस्थित होते.**

# गव्हाण विद्यालयात विविध उपक्रमांनी शिक्षण सप्ताह साजरा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त संपूर्ण देशात २२ जुलैपासून शिक्षण सप्ताह आयोजित करण्यात आला. या सप्ताहाचा शेवटचा दिवस रविवारी (दि.२८) समुदाय सहभाग दिवस म्हणून रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

या वेळी इयत्ता दहावी गुरुकुल वर्गाच्या वतीने विद्यालयास वृक्ष भेट देऊन या वर्गातील विद्यार्थ्यांच्या रमेश वर्तक, शांताराम पाटील व विकास नाईक या पालकांनी आपला सहभाग नोंदवला. समुदाय सहभाग दिनानिमित्त विद्यालयात इयत्ता पाचवी ते सातवी, इयत्ता आठवी आणि इयत्ता नववी ते दहावी अशा तीन टप्प्यात वर्गनिहाय पालक मेळावे आयोजित करून सभा आणि सहविचार सभा झाली.

मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभांना रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, ज्युनिअर कॉलेज विभागाचे प्रमुख बाबुलाल पाटोळे, राजेंद्र चौधरी, राजू खेडकर, माणिक घरत, उमेश पाटील, जयवंती ठाकूर, अर्चना पाटील, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, एकनाथ ठाकूर, सागर रंधवे, ज्येष्ठ शिक्षिका चित्रलेखा पाटील, गुरुकुल प्रमुख संदीप भोईर, शितल कुमार म्हात्रे, योगिता पाटील, प्रमोद करावकर वृषाली म्हात्रे, प्रणाली पाटील, द्रोपदी वर्तक, उर्मिला गोंधळी, प्रशांत परदेशी, अपर्णा देवकुळे आदींसह कर्मचारी आणि विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

### शिक्षण सप्ताहातील विविध उपक्रम

* **पहिला दिवस** : अध्ययन अध्यापन साहित्य दिवस म्हणून या दिवशी विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या साहित्याची निर्मिती कशी करावी याविषयी शिक्षकांनी मार्गदर्शन केले तसेच काही शैक्षणिक साहित्याची निर्मिती कार्यशाळेत करून घेतली. याच दिवशी विद्यालयामध्ये आंग्लभाषा वाचन कट्टा स्थापन करण्यात आला, तसेच प्रत्येक वर्गासाठीदेखील अशा वाचन कट्ट्याची स्थापना करण्यात आली.

* **दुसरा दिवस** : मूलभूत संख्याज्ञान व साक्षरता दिवस म्हणून या दिवशी मूलभूत संख्याज्ञानासाठी विद्यार्थ्यांना विविध उपक्रम गणित, इंग्रजी व इतर विषय शिक्षकांनी राबविले, तसेच काही वर्गांमधून इंग्रजी भाषेमधून विद्यार्थ्यांनी गटचर्चा करून संख्या मूलभूत संख्या ज्ञानाबद्दल ज्ञात संकल्पना स्पष्ट केल्या.

* **तिसरा दिवस** : क्रीडा दिवस या दिवशी वर्गनिहाय बुद्धीबळ, भाषिक खेळ आदी इनडोर आणि पावसाची रिपरिप चालू असतानाही विद्यार्थ्यांनी मैदानावर विविध प्रकारच्या खेळांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवून हा दिवस साजरा केला.

* **सहावा दिवस** : मिशन लाईफच्या दृष्टिक्षेपात इको क्लब उपक्रम व शालेय पोषण दिवस म्हणून हा दिवस अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. या दिवशी विद्यालयामध्ये इको क्लबची स्थापना करण्यात आली. या वेळी विद्यालयाच्या बगीच्यामध्ये विविध प्रजातींच्या वृक्षांचे वृक्षारोपण विद्यालयाचे मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे, उपमुख्यद्यापक प्रमोद मंडले, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख बाबुलाल पाटोळ व इको क्लबच्या विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

* **सातवा दिवस** : समुदाय सहभाग दिवस म्हणून साजरा करण्यात आला. सर्व पालकांनी या समुदाय सहभाग दिवसामध्ये आपला सहभाग नोंदवला, तसेच विद्यालयाच्या वतीने यावेळी पालकांबरोबर अल्पोपार, चहापान व परिसंवाद आयोजित करण्यात आला.







**पनवेल : युवा बूथ अध्यक्ष गुरुनाथ भोपी यांना वाढदिवसानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर व भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी रविवारी शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी सभागृह नेते परेश ठाकूर, दुंदरे ग्रामपंचायत सदस्य प्रणय भोपी, नवनाथ भोपी, राजन भगत, शरद भोपी, रवी भगत आदी उपस्थित होते.**

## संपादकीय

# पदकांचा श्रीगणेशा

खेळांचा महाकुंभ म्हणून ओळखली जाणारी ऑलिम्पिक स्पर्धा यंदा पॅरिसमध्ये होत असून जगभरातील खेळाडू या स्पर्धेत आपले क्रीडाकौशल्य दाखवत आहेत. ऑलिम्पिक स्पर्धेत भारतीय चमूही सहभागी झाला असून नेमबाज मनू भाकरने कांस्यपदक पटकावित भारताच्या पदकांचा श्रीगणेशा केला आहे.

**३३ वी ऑलिम्पिक स्पर्धा यंदा फ्रान्सच्या यजमानीत राजधानी पॅरिसमध्ये होत आहे. तब्बल १०० वर्षांनंतर पॅरिसला ऑलिम्पिकच्या यजमानपदाची संधी मिळाली. पॅरिसमध्ये याआधी १९०० आणि १९२४ साली आयोजन करण्यात आले होते. लंडननंतर पॅरिसमध्ये ऑलिम्पिक स्पर्धेचे आयोजन करण्याची ही तिसरी वेळ आहे. १८९६मध्ये ग्रीसची राजधानी अथेन्समध्ये प्रारंभ झालेली आधुनिक ऑलिम्पिक ते आताची पॅरिस ऑलिम्पिक हा १२८ वर्षांचा प्रवास थक्क करणारा आहे. देश, धर्म, जातपात, लिंग, वय, भाषा आदी साऱ्या भेदभावांना मूठमाती देत विश्वशांतीचा मूळ उद्देश ऑलिम्पिक स्पर्धेच्या निमित्ताने सफल झाला, असे आवर्जुन नमूद करायला हवे. कालानुरूप या स्पर्धेला नवा साज चढत गेला. नवनव्या खेळांच्या समावेशाबरोबरच उद्घाटन समारंभ, ऑलिम्पिक ग्राम आदींमध्ये स्पर्धेगणिक अमूलाग्र बदल घडत गेला. ऑलिम्पिक स्पर्धेचा गवगवा होत असताना तिला काही गोष्टींचे गालबोटही लागले. स्पर्धेत पदके पटकाविण्यासाठी उत्तेजक द्रव्ये (ड्रग्ज) घेतल्याचे आरोप अनेक खेळाडूंवर झाले. एवढेच नव्हे तर दोषी ठरलेल्या काही खेळाडूंकडून पदके काढून घेण्याच्या दुर्दैवी घटनाही घडल्या आहेत. या सर्वांवर मात करीत ही स्पर्धा पुढे जात आहे. भारताने राष्ट्रीय खेळ असलेल्या हॉकीमध्ये १९२८पासून १९५६पर्यंत सलग सहा वेळा, तर त्यानंतर १९६४ व १९८० अशा एकूण आठ ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. यानंतर मात्र हॉकीतील भारताचा सुवर्णकाळ ओसरला, तर १९५२मध्ये हेलसिंकी ऑलिम्पिक स्पर्धेत अतिशय प्रतिकूल परिस्थितीत खाशाबा जाधव यांनी वैयक्तिक पदक भारताला मिळवून दिले. त्यांनी कुस्तीमध्ये कांस्यपदक पटकावून इतिहास रचला होता. त्यानंतर भारतीय खेळाडू या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत सहभागी होऊन यश मिळवित आले आहेत. मागील २०२२च्या ऑलिम्पिकमध्ये भारताच्या नावावर सात पदके होती, ज्यात एक सुवर्ण, दोन रौप्य आणि चार कांस्य पदकांचा समावेश होता. नीरज कुमारने टोकियो ऑलिम्पिकमध्ये भालाफेक स्पर्धेत सुवर्णपदक जिंकून इतिहास रचला होता. यंदाच्या ऑलिम्पिकमध्येही नीरजकडून देशाला 'सुवर्ण' कामगिरीची अपेक्षा आहे. नीरजशिवाय बॅडमिंटन आणि हॉकी संघाकडूनही भारताला पदकांची आशा आहे. या वेळी भारतीय हॉकी संघ सुवर्णपदक जिंकण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करेल. अशातच भारताची २२ वर्षीय नेमबाज मनू भाकरने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये इतिहास रचत कांस्यपदकावर आपले नाव कोरले आहे. भारतासाठी ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकणारी मनू ही पहिली महिला नेमबाज ठरली आहे. क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन देणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिचे अभिनंदन केले. भारत हा क्रिकेटवेडा देश आहे, पण अलिकडच्या काही वर्षांत इतर खेळ आणि खेळाडूंनाही चांगले दिवस आले आहेत. यासाठी केंद्र सरकारने विशेष योजना आखून क्रीडा क्षेत्रावर भर दिलेला आहे. खेळाडूंना आवश्यक निधी, सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. याचाच परिपाक म्हणजे खेळांमध्येही भारत जागतिक पातळीवर प्रगती करीत असल्याचे चित्र दिसून येत आहे.**

# धुवांधार पावसाने महापुराच्या आठवणी जाग्या





## खबरबात
विजय मांडे

२५ जुलै रोजी पावसाने धुवांधार बरसात केली. आठवडाभर पाऊस पडतच आहे, मात्र गुरुवारचा पाऊस म्हणजे सर्वांच्याच उरात धडकी भरली होती. तालुक्यातील बहुतांश नद्यांना पूर आला होता. त्यामुळे २४ जुलै १९८९ रोजी झालेल्या महापुराच्या आठवणी जाग्या झाल्या. २०२१ साली २२ जुलैच्या पहाटे शहरात पाणी शिरले होते. त्याचीही आठवण झाली. म्हणजे १९८९पासून आतापर्यंत जुलै २२ ते २५दरम्यान महापूर झाला आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

१९८९ साली महापूर आला होता. त्या वेळी जांभूळपाडा, नागोठणे, महाड आदी ठिकाणी पाणी शिरून जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले होते. अगदी गावेच्या गावे पाण्याखाली गेली होती. अनेकांना प्राण गमवावे लागले होते. काहीजण कित्येक तास झाडावर बसून राहिले होते. एखाद्या झाडावर कुटुंबातील काही लोक बसले होते. त्यातील एखादा कुटुंबातील सदस्य वाहून गेल्याचे डोळ्यांदेखत पहिले आहे. काय वाटले असेल? ते उर्वरित कुटुंबियांनाच माहित.

२००५ सालीसुद्धा मुसळधार पावसाने धुमाकूळ घातला होता. ही घटना जुलै महिन्यातील २६ तारखेला झाली होती. त्या वेळी माथेरानच्या मिनीट्रेनचे रूळ वाहून गेले होते. तेव्हापासून नेरळ-माथेरानची मिनीट्रेन विस्कळीत झाली होती. त्यानंतर बरीच वर्षे पूर झाला नाही, मात्र दरडी कोसळण्याचे प्रकार सुरू झाले. रायगड जिल्ह्यात खूप ठिकाणी दरडी कोसळून गावे ढिगाऱ्याखाली गडप होऊन मोठ्या प्रमाणात जीवितहानी झाली होती. कर्जत शहरातील तहसील कार्यालय असलेल्या टेकडीच्या बाजूला असलेल्या मुद्रे बुद्रुकच्या बाजूला भूस्खलन झाले व काही घरांचे नुकसान झाले. त्या बाधित घरांना प्रत्येक पावसाळ्यात स्थलांतर करण्याच्या नोटीस दिल्या तरी त्यातील बहूतांश कुटुंबीय जीवाला धोका असूनही आपली घरे सोडत नाहीत. भविष्यात काहीही होऊ शकते. त्यामुळे ही टांगती तलवार कायम त्यांच्या डोक्यावर राहील हे कटू सत्य आहे.

एक वर्षी ऑगस्ट महिन्यातही धुवांधार पावसाने पूर झाला होता. तो जुलै महिन्यात नसून ऑगस्ट महिन्यात झाला होता. ती तारीख होती ५ ऑगस्ट. या दिवशीही जांभूळपाडा, नागोठणे, महाडमध्ये पाणी शिरले होते. २०२१ साली २२ जुलै रोजी झालेल्या पावसात काही ठिकाणी इतिहासात पहिल्यांदाच पाणी शिरले होते. त्यामध्ये नाना मास्तरनगरचा समावेश आहे. या वेळी कर्जत नगर परिषद हद्दीलगत असलेल्या ज्ञानदीप सोसायटीतील घरांमध्ये पाणी शिरले होते व अनेक घरातील किमती वस्तू खराब झाल्या होत्या. या सोसायटीत नेहमीच पाणी शिरते. कर्जत-पनवेल रेल्वेमार्ग झाल्यापासून या सोसायटीत पाणी शिरत असे. कर्जतमधील रेल्वे प्रवाशांच्या समस्या सोडविण्यासाठी नेहमीच पुढाकार घेणारे पंकज ओसवाल यांनी तेथे जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. ही समस्या आमदार महेंद्र थोरवे यांच्या निदर्शनास आणून दिली. आमदार थोरवे यांनी त्यामध्ये लक्ष घालून त्यावर उपाययोजना करण्यासाठी मध्य रेल्वे प्रशासनाशी संपर्क करून ही समस्या कायमची सोडविण्यासाठी सूचना केल्या. त्यानंतर मध्य रेल्वेने उपाययोजना करून ती समस्या सोडविली. यासाठी कर्जत रेल्वे पोलीस ठाण्याचे तत्कालीन निरीक्षक संभाजी यादव यांचे सहकार्यही महत्त्वाचे ठरले होते.

तालुक्यातील अन्य ठिकाणीसुद्धा जुन्या पुलांवरून पाणी जाऊन अनेक गावांचा संपर्क तुटत असतो. त्यामुळे नवीन पूल बांधणे गरजेचे आहे. तालुक्यातील एक गाव असे होते की त्या गावातील अबालवृद्धांना पावसाळ्यात तारेवरून कसरत करून ये-जा करावे लागत असे. त्या गावाचे नाव आहे बेंडसे. स्वातंत्र्य मिळाल्यापासून या गावाने तारेवरची कसरत केली आहे. सुरेश लाड आमदार असताना त्यांनी सात-आठ वर्षांपूर्वी त्या गावासाठी पूल मंजूर केला आणि लगेचच उभारला आणि त्या गावाची तारेवरची कसरत बंद झाली. त्या गावातसुद्धा नदी उलटल्यावर पाणी शिरते.

पूर्वी संततधार पाऊस सुरू झाला की, कर्जतकरांना धडकी भरत असे. ही समस्या नदीलगत राहणाऱ्या भगवान टॉकीज व कोतवाल नगरवासीयांनी कित्येक वर्षे सहन केली. पावसाळ्यात कित्येक रात्री येथील रहिवाशांनी जागून काढल्या आहेत. ही समस्या जुन्या पादचारी पुलाला नदी भरल्यानंतर पाणी सोडण्यासाठी एकच दरवाजा होता. त्यामुळे पाऊस थोडा जोरात झाला की शहरात पाणी शिरत असे. आमदार सुरेश लाड यांनी त्या पुलाच्या जागेवर नवीन पादचारी पूल मंजूर केला. या पुलाला तब्बल ३८ दरवाजे आहेत. शिवाय नदीच्या कडेला संरक्षक भिंत बांधली. त्यामुळे ही समस्या कायमची संपुष्टात आली. यासाठी तत्कालीन पालकमंत्री सुनील तटकरे यांची महत्त्वाची भूमिका ठरली. त्यानंतर त्यांनी उद्योजक भगवान भोईर यांच्या सहकार्याने नदी स्वच्छ करण्याचा निर्णय घेतला. या उपक्रमामुळे नदी स्वच्छ झाली व गाळ काढल्याने ती खोल व थोडी रुंदही झाली. त्यामुळे काही वर्षे शहरात पाणी शिरले नाही, मात्र २०२१च्या जुलै महिन्यात कधीही नव्हते इतके पाणी शहरात शिरले. त्यामुळे नदीच्या कडेला असणाऱ्या नागरिकांच्या पोटात पुन्हा गोळा आला. त्यानंतर आमदार महेंद्र थोरवे यांनी २०२३ व २०२४ ही दोन वर्षे नदी स्वच्छतेचा उपक्रम हाती घेतला आणि या वर्षातील २५ जुलै रोजी झालेल्या धुवांधार पावसातही शहरात पाणी शिरून नुकसान झाले नाही. नदी उलटली नाही, मात्र नदीला सोडण्यात आलेले नाले उलटले, पण त्यामुळे नुकसान झाले नाही.

आमदार महेंद्र थोरवे यांनी नदीच्या किनाऱ्यावर प्रति पंढरपूर आळंदी साकारली व जगातील सर्वात उंच श्री विठ्ठलाची मूर्ती तेथे उभारली. उन्हाळ्यात नदी पूर्णपणे कोरडी पडते म्हणून त्यांनी एक कोल्हापूर टाईप छोटा बंधारा उभारला, जेणेकरून श्री विठ्ठल मूर्तीचा परिसर उन्हाळ्यातही पाणी साठल्याने चांगला सुशोभित दिसेल. पावसामुळे नदीला पाणी वाढले तर या बंधाऱ्यामुळे लवकर नदी उलटेल अशी भीती अनेकांच्या मनात होती मात्र तसे झाले नाही. नदी उलटलीच नाही व शहरात पाणी शिरून नुकसान झाले नाही. एकंदरीत यंदाच्या २५ जुलैच्या पावसाने पस्तीस वर्षांपूर्वी झालेल्या महापुराची आठवण झाली हे नक्की!

## बदलते तंत्रज्ञान

# जिओला टक्कर देण्यासाठी एअरटेलने आणला ढासू प्लॅन

एअरटेल ही देशातील सर्वांत मोठी टेलिकॉम कंपनी आहे. एअरटेलचे युजर्स कोटींच्या घरात आहेत. अलीकडेच, टेलिकॉम कंपन्यांनी आपल्या टॅरिफ प्लॅन्सच्या किमती वाढवल्या होत्या.




रिलायन्स जिओने सर्वांत आधी आपल्या रिचार्ज प्लॅनमध्ये वाढ केली. जिओने ३ जुलै रोजी रिचार्ज प्लॅनच्या किमती वाढवल्या होत्या. यानंतर एअरटेल आणि व्ही (VI) या टेलिकॉम कंपन्यांनी आपले टॅरिफ प्लॅन्स महाग केले.

या वाढीनंतर तुम्हाला एअरटेलचा वर्षभराचा प्लॅन कमी किमतीत हवा असेल तर काळजी करण्याची गरज नाही, कारण आम्ही तुम्हाला एअरटेलच्या अशा प्लॅनबद्दल सांगणार आहोत, ज्याची व्हॅलिडिटी ३६५ दिवसांची आहे.

एअरटेल कंपनीच्या पोर्टफोलिओमध्ये इतरही अनेक प्लॅन्स आहेत, ज्यांची व्हॅलिडिटी ३६५ दिवसांची आहे. पण, आम्ही तुम्हाला ज्या प्लॅनची माहिती देत आहोत, त्याची किंमत १,९९९ रुपये आहे.

कंपनीची सर्वोत्तम लॉँग टर्म प्लॅन आहे. यामध्ये युजर्सला सर्वात कमी किमतीत ३६५ दिवसांची दिवसांची व्हॅलिडिटी मिळते. ३६५ दिवसांच्या व्हॅलिडिटीसह युजर्सना या प्लॅनमध्ये अनलिमिटेड कॉलिंगची सुविधादेखील मिळते.

याचा अर्थ तुम्ही कोणत्याही नेटवर्कवर तुम्हाला हवे तितके मोफत कॉलिंग करू शकाल. याशिवाय युजर्सला दररोज १०० एसएमएसदेखील मिळतात तसेच या प्लॅनमध्ये युजरला २४ जीबी डेटा मिळतो.

दरम्यान, युजर्स अतिरिक्त डेटा देखील खरेदी करू शकतो. यासाठी युजर्सला डेटा व्हाउचर वापरावं लागेल. ज्या युजर्सना कमी डेटा आणि अधिक व्हॅलिडिटी असलेला प्लॅन हवा आहे, त्यांच्यासाठी हा प्लॅन सर्वोत्तम पर्याय आहे.

या प्लॅनसह युजर्सना ॲडिशनल बेनिफिट्स देखील मिळतात. यामध्ये युजरला अपोलो २४X७ सर्कलमध्ये तीन महिने फ्री ॲक्सेस मिळतो.

यासोबतच यूजरला विंक आणि विंक म्युझिकवर मोफत हॅलो ट्यूनची सुविधाही मिळते. याशिवाय ३६५ दिवसांच्या व्हॅलिडिटीसह एअरटेलच्या प्लॅनची किंमत ३,५९९ रुपये आणि ३,९९९ रुपये आहे.

# बॉलीवूड अभिनेता संजय दत्त

## निमित्त



संजय दत्त हा एक भारतीय अभिनेता आहे. त्याने बालपणात १९७२मध्ये आपल्या वडिलांसोबत रेशमा और शेरा या चित्रपटातून आपल्या अभिनयाची छबी उमटवली आहे. संजय दत्त एक यशस्वी अभिनेता, प्रसिद्ध चित्रपट अभिनेत्री नरगिस व अभिनेता संसदपटू सुनील दत्त यांचा मुलगा, खासदार प्रिया दत्तचा भाऊ आहे. वडिलोपार्जित मिळालेली प्रसिद्धी व धनदौलत मिळाल्यानंतरही हा नायक शेवटी खलनायक बनून चाहत्यांचे मनोरंजन करत राहिला. त्याच्याविषयी माहिती पाहूया.

संजय दत्त याचा जन्म २९ जुलै १९५९ या दिवशी झाला. त्याचे पूर्ण नाव संजय बलराज दत्त आहे. त्याचे वडील दिग्गज आणि सुप्रसिद्ध अभिनेते आणि दिग्दर्शक सुनील दत्त हे आहे तसेच त्यांची आई लोकप्रिय अभिनेत्री नर्गिस आहेत. १९८१मध्ये रॉकी या चित्रपटाच्या प्रीमियरच्या आधी त्याच्या आईचे निधन झाले. नर्गिस दत्तचा कर्करोगाने मृत्यू झाला. त्याला दोन बहिणी आहेत. प्रिया दत्त आणि नम्रता दत्त. त्याची बहीण प्रिया दत्त ही एक राजकारणी आहे. संजूला त्याच्या आईच्या मृत्यूने खूप मोठा धक्का बसला होता. जेव्हा आईचा मृत्यू झाला, तेव्हा संजू २२ वर्षांचा होता आणि या दुर्घटनेनंतर संजूला ड्रग्स आणि व्यसनाधीनतेचे व्यसन लागले.

संजय दत्तने बऱ्याच चित्रपटांमध्ये काम केले. प्रत्येक पात्र चांगले रंगवले, परंतु प्रेम आणि विनोदी शैलीत तर त्याने यश मिळवून घेतले.

संजय दत्त याने पहिले लग्न १९८७मध्ये रिचा शर्मा हिच्यासोबत केले, मात्र लग्नाच्या नऊ वर्षानंतर रिचा शर्मा यांचे ब्रेन ट्यूमरमुळे १९९६मध्ये निधन झाले. मात्र यांच्या दोघांची एक मुलगी आहे. त्रिशला ही सध्या तिच्या आजी-आजोबांकडे अमेरिकेमध्ये राहते. संजय दत्त याने १९९८ साली मोडेल रिया पिल्लई दुसरे लग्न केले, परंतु काही कारणांमुळे त्याचे नातलग यशस्वी झाले नाही आणि दोघांचेही घटस्फोट झाले. यानंतर संजय दत्त व मान्यता हे भेटले. दोघेही दोन वर्ष एकत्र राहिले. त्यानंतर दोघांनीही गाठ बांधण्याचे ठरवले आणि गोव्यात जाऊन लग्न केले. २१ ऑक्टोबर २०१० रोजी मान्यता दत्तने इक्रा आणि शहारन या जुळ्या मुलांना जन्म दिला.

संजय दत्त याने आयुष्यात अनेक चढ उतार पाहिले. त्याचा अभिनेता म्हणून सुरुवात चांगलीच गाजली, परंतु अमली पदार्थांच्या आहारी गेले व अनेक वर्षे चित्रपट सृष्टीपासून दूर होते. अमली पदार्थांचे सेवन केल्याने त्यांची तब्येत एकेकाळी फारच खालावली होती. त्या वेळेस सुनील दत्त यांनी त्याला अमेरिकेत उपचारांसाठी नेले. अमली पदार्थांचे संजय दत्त याचे व्यसन उपचारानंतर सुटले व त्याने काही काळ अमेरिकेत व्यतीत केला. या काळात त्याला अमेरिकेतच रहाण्याची व चित्रपटसृष्टीतील प्रसिद्धीपासून दूर रहाण्याचे ठरवले होते, परंतु सुनील दत्त यांनी आपल्या इच्छेखातर भारतात परतण्याची विनंती केली व त्यास संजय दत्त याने होकार दिला.

भारतात परतल्यानंतर काही काळानंतर पुन्हा चित्रपटसृष्टीत प्रवेश केला. अनेक हिट चित्रपट दिले. या काळात वैयक्तिक आयुष्यात बदल झाले तसेच १९९२च्या दंगली व नंतर झालेल्या बॉम्बस्फोटात त्याचे नाव होते. त्याच्या रहात्या घरातून बेकायदेशीर एके ५६ रायफल हस्तगत करण्यात आली. **(साभार : मराठी मोल)**

## क्लिक...क्लिक...!



**अलिबाग : पावसाची थोडी उघडीप मिळताच अंतिम टप्प्यातील भातशेतीच्या लावणीला सुरुवात झाली आहे.** (छाया : नितीन शेडगे)

## आरोग्य प्रहर

# दारूच्या व्यसनामुळे होतो कॅन्सर, दुर्लक्ष करू नका!



हेड ॲण्ड नेक कॅन्सर हा एक अतिशय गंभीर आजार आहे. जगात या आजाराचे ६० टक्के रुग्ण भारतात आढळतात. हा आजार गुटखा, पान मसाला, विडी, सिगारेट यामुळे होतो. त्याची लक्षणे जाणून घेऊयात...

नागपुरात हेड ॲण्ड नेक कॅन्सरच्या रुग्णांमध्ये वाढ होत असल्याचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कॅन्सर इन्स्टिट्युटच्या (आरएसटीआय) अभ्यासात आढळून आले आहे. दरवर्षी २७ जुलै हा हेड ॲण्ड नेक कॅन्सर दिन म्हणून साजरा होत असतो. त्यानिमित्ताने आरएसटीआयने हा निष्कर्ष जाहीर केला आहे.

७५ टक्के रुग्णांमध्ये तंबाखू हे या कर्करोगाचे मुख्य कारण आहे. सर्व प्रकारच्या कर्करोगांमध्ये हेड ॲण्ड नेक कॅन्सर सातव्या क्रमांकावर आहे. मानेपासून तर मेंदूपर्यंत नाक, तोंड, स्वययंत्र, थायरॉइड ग्रंथी इत्यादी ठिकाणी साधारणत: हा कर्करोग होत असतो. दरवर्षी जगात तीन लाख २५ हजार मृत्यू या आजाराने होतात. दक्षिण पूर्व आशियात या कर्करोगाचे रुग्ण अधिक आढळतात, मात्र अमेरिका, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, आफ्रिका, ब्राझील या देशांच्या तुलनेत भारतात हे रुग्ण अधिक प्रमाणात आहेत. भारतातही पूर्वोत्तर राज्यांमध्ये प्रमाण जास्त आहे. गेल्या काही वर्षात औरंगाबाद, दिल्ली, चेन्नई, भोपाळ आणि नागपूर येथेही रुग्णांच्या संख्येत वाढ झाली आहे.

आरएसटीआयचे संचालक डॉ. कर्तारसिंग यांच्या मते, कर्करोग झाल्याचे उशिरा लक्षात येणे हा यातील सर्वात मोठा धोका आहे. त्वरित तपासणी होऊन उपचार झाले तर हा कर्करोग रोखता येऊ शकतो, असे डॉ. बी. के. शर्मा यांनी सांगितले.

या संस्थेतील डॉ. अनिरुद्ध वाघ आणि डॉ. रेणू शिवकला यांच्या नेतृत्वात झालेल्या अभ्यासानुसार २०२० ते २०२२ या काळात ८,३२७ जणांना कर्करोगाचे निदान झाले व त्यातील ३,३१६ रुग्ण नेक ॲण्ड हेड कॅन्सरचे आढळून आले. यात २५ टक्के महिला आणि ७५ टक्के पुरुष आहेत. त्यामुळे लक्षणे आढळल्यास वेळीच निदान करून घेण्याचे आवाहन आरएसटीआयने केले आहे.

# लोकअदालतीमध्ये तब्बल १२ हजार ३२८ प्रकरणे निकाली

## १९ कोटी ४४ लाख ८२४ रुपयांची तडजोड रक्कम वसूल

**रायगड : रामप्रहर वृत्त**

दाखलपूर्व आणि प्रलंबित खटल्यांचा जलद निपटारा व्हावा या हेतूने आयोजित केलेल्या लोकन्यायालयात अनेक प्रकरणे निकाली काढण्यात आली असून वादपूर्व व दाखल अशी एकूण १२ हजार ३२८ प्रकरणे सामंजस्याने मिटविण्यात यश आले आहे, अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधीश अमोल शिंदे यांनी दिली.




संपूर्ण भारतभर शनिवारी (दि.२७) राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. रायगड जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. एस. राजंदेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केलेल्या लोकअदालतीमध्ये ४७ हजार ६८ वादपूर्व प्रकरणे व १२ हजार २९६ प्रलंबित अशी एकूण ५९ हजार ३६४ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी १० हजार २६५ वादपूर्व प्रकरणे व दोन हजार ६३ प्रलंबित प्रकरणे अशी एकूण १२ हजार ३२८ प्रकरणे सामंजस्याने मिटवून त्याद्वारे पक्षकारांना एकूण १९ कोटी ४४ लक्ष ८२४ रुपयाची तडजोड रक्कम मिळवून देण्यात आली आहे.

दोन जोडप्यांचा (पनवेल १, अलिबाग १) वाद मिटल्यामुळे संसार सुरळीत झाला आहे. मोटार अपघात प्रकरणांमध्ये चार कोटी १४ लाख ४४ हजार ५४६ रुपये इतकी नुकसान भरपाई मंजूर जिल्ह्यामध्ये एकूण ३४ प्रकरणांमध्ये तडजोड झाली असून पक्षकारांना चार कोटी १४ लाख ४४ हजार ५४६ रुपये इतकी नुकसान भरपाईची रक्कम मंजूर करण्यात आली आहे.

अलिबाग येथील पक्षकारांचा प्रमुख जिल्हा न्यायाधीश ए. एस. राजदेकर व पॅनलवरील न्यायाधीशांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व प्रतिकात्मक धनादेश दिला. रायगड जिल्ह्यातील विविध न्यायालयांत २७ लोकअदालतीचे कक्ष स्थापन करण्यात आले होते. लोकअदालतीमध्ये पक्षकारांना न्यायालयात येण्याची सक्ती न करता व्हिडीओ कॉलचा वापर करूनसुद्धा प्रकरणे मिटविण्यात आली.

# बालकल्याण समितीचे काम कौतुकास्पद -सोमनाथ घार्गे

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

बालकल्याण समितीचे काम कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गार पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी केले. महिला बालविकास विभाग, रायगड अंतर्गत बालकल्याण समिती व पोलीस अधीक्षक कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने बालकल्याण सन्मान सोहळा व ताणतणाव व्यवस्थापन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी ते बेलत होते.

कोकण मार्गदर्शक अ‍ॅड. सीमा अदाते, बाल कल्याण समिती सदस्य डॉ. गाणार, अ‍ॅड. झेमसे, जि. प. कार्यक्रम व्यवस्थापन जयवंत गायकवाड, कॅलिडा रिहॅबचे डॉ. प्रशांत, डॉ. संतोष पवार, डॉ. अक्षय पाटील उपस्थित होते. या वेळी बालकांच्या क्षेत्रात कायद्याला अनुसरून उल्लेखनीय काम केलेल्या पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

बालकांची काळजी व संरक्षणाची जबाबदारी घेऊन बालकांचे पुनर्वसन करण्यासाठी कॅलिडा रिहॅब सेंटर व भूमिका फाउंडेशनचे मोठे योगदान मिळाले. याबाबत पोलीस अधीक्षकांनी दोन्ही संस्थांचे कौतुक करून बालकल्याण समितीला धन्यवाद दिले.

या कार्यक्रमात बालकल्याण क्षेत्रात उल्लेखनीय काम केलेले पोलीस निरीक्षक राजेंद्र मायने (महाड), निवृत्ती बोराडे (माणगाव), सुरेंद्र गरड (कर्जत), प्राची पांगे, माधुरी घाडगे, वर्षा पाटील तर नवी मुंबईचे सुनील होलार, अभिजीत मोरे, दत्तात्रय पवार, संतोष पिलाने, प्रणिता भाकरे, सारिका बोराटे, रेल्वे पोलीस आदींना सन्मानपत्र व मानचिन्ह देण्यात आले. या कार्यक्रमात राहुल धुळे यांचा निरोप समारंभ करून संस्थेच्या व संपर्क बालग्रामचे विनायक पाटील, संपर्क बालग्रामचे खंदारे यांचा सत्कार करण्यात आला.



# विद्यार्थ्यांनी शैक्षणिकदृष्ट्या सक्षम होऊन आपले भवितव्य घडवावे -प्रसाद भोईर

**पेण : प्रतिनिधी**

सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचे युग असून त्याद्वारे शिक्षण प्रणाली बदलत चालली आहे, मात्र या बदल्यात शिक्षण क्षेत्रातसुद्धा आपल्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिकदृष्ट्या सक्षम होऊन आपले भवितव्य घडवावे असे प्रतिपादन भाजप पेण विधानसभा प्रमुख प्रसाद भोईर यांनी पेण येथे विद्यार्थी गुणगौरव समारंभप्रसंगी केले.



बहुजन विद्यार्थी संघटनतर्फे दहावी व बारावी विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ पेण महात्मा गांधी वाचनालय येथे रविवारी (दि.२८) आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला विद्यार्थी संघटनेचे रायगड जिल्हाध्यक्ष संतोष गायकवाड, पीआरपी जिल्हाध्यक्ष सिताराम कांबळे, यशवंत वाशिकर, एम.डी.कांबळे, दिपक सोनावणे, भास्कर पाटील, विद्यार्थी संघटना तालुकाध्यक्ष नागेश सुर्वे, शहर अध्यक्ष समिर घायतळे, को. बौ. महासभेचे राम गायकवाड, महिला आघाडी सुवर्णा सोनावणे, अरुणा सोनावणे, प्रभाकर घायतले आदींसह विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी पुढे बोलताना प्रसाद भोईर म्हणाले की, मलासुद्धा उच्च शिक्षण घेत असताना अनेक अडचणींचा सामना करावा लागला, मात्र शैक्षणिकदृष्ट्या तुम्हाला कोणती अडचण असेल तर त्यासाठी आपला भाऊ म्हणून उभा राहणार असल्याचे सांगून विद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून त्यांचा गुणगौरव होत असल्याने विद्यार्थ्यांसाठी ते प्रेरणादायी आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अधिक शिक्षण घेऊन आपल्या आई-वडिलांसह समाजाचे नाव उज्वल केले पाहिजे, असे त्यांनी शेवटी सांगितले.

या वेळी तालुक्यातील दहावी बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

# वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सध्या संपूर्ण जिल्ह्यात पर्यटकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली असून यामुळे वाहनांची संख्याही वाढली आहे. त्यामुळे बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्याही वाढली आहे.

शनिवारी (दि.२७) २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वाहतुकीचे नियमभंग करणाऱ्या एकूण ३०६ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. या वाहनचालकांकडून वाहतूक पोलिसांनी दोन लाख ९९ हजार २०० रुपये इतका दंड आकारला आहे. पोलिसांच्या धडक कारवाईने चालकांचे धाबे दणाणले आहेत.

# उघड्या ट्रान्सफॉर्मरमुळे जीवितास धोका

## महाडमधील प्रकार; नागरिकांत नाराजी

**महाड : प्रतिनिधी**

विविध ठिकाणी असलेल्या महावितरणचे ट्रान्सफॉर्मर उघडे ठेवण्यात आले आहेत. यामुळे शेतकऱ्यांना, विद्यार्थ्यांना धोका निर्माण झाला आहे. असुरक्षित काम करणाऱ्या महावितरण कंपनीविरोधात नागरिकांमध्ये संताप निर्माण झाला असून करोड रुपये खर्च कुठे केले जात आहे? असा सवाल उपस्थित केला जात आहे.



वीजपुरवठा करण्यासाठी जागोजागी ट्रान्सफॉर्मर बसवण्यात आले आहेत. यासाठी कोट्यवधी रुपये खर्च होतात, मात्र या ट्रान्सफॉर्मरचे दरवाजे सताड उघडे ठेवले जातात. ऐन पावसाळ्यात या ट्रान्सफॉर्मरजवळ गवत, वेली आणि झाडेझुडपे मोठ्या प्रमाणावर उगवतात. यामुळे शेजारून ये-जा करणाऱ्या नागरिकांना धोका निर्माण झाला आहे. अनेक ट्रान्सफॉर्मर शेतकऱ्यांच्या शेतामधून तर रस्त्याकडेला बसवण्यात आलेले आहे. आधीच शेतकऱ्यांच्या शेतातून गेलेल्या विजेच्या पोलमुळे पाळीव जनावरे आणि शेतकरी मृत्युमुखी पडल्याच्या घटना यापूर्वी घडल्या आहेत, मात्र तरीदेखील महावितरणचे अधिकारी आणि कर्मचारी असुरक्षित काम करीत असल्याचे सातत्याने दिसून येत आहे.

> **वितरण पेट्या उघड्या राहणार नाहीत यासाठी महावितरणकडून खर्च करण्यात आलेला आहे. या ट्रान्सफॉर्मरशेजारी संरक्षक जाळ्या आणि पत्रे बसवण्यासाठी तरतूद करण्यात आली होती. त्यामुळे सध्या तरी कुठेही उघड्या वितरण पेट्या दिसणार नाहीत.**
> **केंद्रे, कार्यकारी अभियंता, महावितरण महाड**

महाड तालुक्यात विविध ठिकाणी उघड्या ट्रान्सफॉर्मरमुळे धोका निर्माण झाला असला तरी महावितरणच्या कर्मचाऱ्यांचे याकडे दुर्लक्ष आहे.

# पुरानंतर महाड पालिकेच्या कर्मचाऱ्यांनी केली स्वच्छता

**महाड : रामप्रहर वृत्त**

शहराच्या विविध भागात गुरुवारी आलेल्या पुरानंतर आपले दुकान, परिसर व रस्ता स्वच्छ करण्याच्या हेतूने सकाळी घराबाहेर व्यापारी बांधव आले होते. या वेळी नगर परिषदेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांनी संपूर्ण शहराची स्वच्छता करून दिली. यामुळे संभाव्य साथीच्या रोगांना आळा बसला.



महाड शहरासह संपूर्ण तालुक्यात तुफानी पर्जन्यवृष्टीने जनजीवन विस्कळीत झाले. गुरूवारी सकाळी शहरात शिरलेले पाणी रात्री उशिरा ओसरल्यावर केवळ आठ तासांच्या आत महाड नगर परिषदेच्या कर्मचाऱ्यांनी शहराची संपूर्ण स्वच्छता केली.

जवळपास १५ दिवसांपेक्षा जास्त काळापासून शहरात डेंग्यूच्या रुग्णांची वाढ झाली आहे. हे लक्षात घेता नगर परिषदेचे प्रशासकीय प्रमुख धनंजय कोळेकर स्वच्छता विभागाचे प्रमुख साळवी यांनी विविध भागात आपल्या यंत्रणांना सूचना केल्या.

केवळ आठ तासांमध्येच महाड नगर परिषदेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांनी केलेल्या या कार्यवाहीचे संपूर्ण शहरातील व्यापारी बांधवांसह नागरिकांकडून स्वागत होत आहे. त्यांच्या कार्यपूर्तीला धन्यवाद देण्यात येत आहेत.

# संकल्प एकता मंचतर्फे आवळा व बांबू लागवड

**चौक : प्रतिनिधी**

पनवेल खांदा कॉलनी येथील संकल्प एकता मंच यांच्या वतीने खालापुर तालुक्यातील कांढरोली या गावी नदीकिनारी सुमारे ४०० बांबू व आवळा, वडाच्या झाडाची लागवड करण्यात आली.

पनवेल खांदा कॉलनी येथील सेक्टर १२मधील संकल्प एकता मंच यांच्या वतीने खालापूर तालुक्यातील कांढरोली गावच्या हद्दीतील नदीकिनारी सुमारे ४०० बांबू व आवळा झाडांची लागवड केली. सद्या नदी किनारी बांधकाम केली जाते. मोठ्या पावसात नदी नाले भरून वाहून जातात. त्यातच माती चोरीचे प्रमाण वाढले आहे. यामुळे नदी नाल्यांच्या काठाची धूप होते. शेतात पुराचे पाणी शिरून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. सद्या या परिसरात बांधकाम जास्त प्रमाणात होताना दिसत आहे, मात्र येथे विकसित करणारे झाडे लावणे अगर त्यांचे संगोपन करताना दिसत नाहीत, असेच चित्र दिसून येते.

जमिनीची धूप आणि नदी काठच्या मातीची धूप होऊ नये यासाठी बांबूची लागवड करण्यात येत असून शहरात राहताना आणि कोरोना काळात ऑक्सिजनची गरज आम्हाला आजही आठवते. यासाठी आम्ही आवळा या औषधी झाडांची, वड, पिंपळ यांच्यासारख्या ऑक्सिजन देणाऱ्या झाडांची लागवड कांढरोली ग्रामस्थांच्या सहकार्याने करीत असल्याचे संकल्प एकता मंचच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. ही झाडे जागविण्याचादेखील संकल्प असून आम्ही झाडे दत्तक घेतली आहे, असेही त्यांनी सांगितले.

कांढरोली ग्रामस्थांच्या वतीने संकल्प एकता मंच यांचे आभार व्यक्त करून स्थानिक म्हणून झाडांचे संवर्धन आम्हीही करू, असे आश्वासन दिले.



सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**लवाद, नगर रचना परियोजना क्र. ७**
**(देवद (भाग), विचुंबे (भाग),उसार्ली खुर्द (भाग),कोळखे पेठ (भाग), शिवकर (भाग), तालुका पनवेल, जिल्हा रायगड) यांचे कार्यालय**
**क्रमांक लवाद/नरयो-७/साधारण/२०२४/**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ (यापुढे ''उक्त अधिनियम'' असे संबोधिले आहे.) चे कलम ६८ (२) मधील तरतुदीनुसार प्रारूप नगर रचना परियोजना नैना क्र. ७ ही उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको, यांचेकडील अधिसुचना क्रमांक सिडको/ नैना/टीपीएस- ७/प्रा.यो./ २०२२ दिनांक- २१ ऑक्टोबर २०२२ प्रमाणे मंजूर केली आहे व सदर योजनेला अंतिम स्वरूप देण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम ७२ मधील तरतुदीनुसार निम्नस्वाक्षरीकार यांची लवाद म्हणून दिनांक - ०२/१२/२०२२ खालील अधिसुचना क्र. टीपीएस-७ /१२२२ /२१५२/ प्र. क्र.१४८/२२/नवि १२ अन्वये नियुक्ती केली आहे.

उक्त अधिनियमाच्या कलम ७२ (३) अन्वये मंजुर प्रारूप नगर रचना परियोजना नैना क्र. ७ ची प्राथमिक योजना व अंतिम योजना मध्ये उपविभागणी करण्यात आली होती. निम्नस्वाक्षरीकार यांनी उक्त अधिनियमांच्या कलम ७२ च्या पोट कलम (७) प्रमाणे तसेच महाराष्ट्र नगर रचना योजना नियम १९७४ च्या नियम क्र. १३(९) प्रमाणे प्राथमिक नगर रचना परियोजना नैना क्र. ७ ही दिनांक ३०/११/२०२३ रोजी तयार केलेली आहे व त्याबाबतची जाहीर सूचना दिनांक ०१/१२/२०२३ रोजीच्या शासन राजपत्र व दिनांक १२/१२/२०२३ रोजीच्या दैनिक रामप्रहर व न्युज बँड मध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे. व दिनांक २९/१२/२०२३ रोजी शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आली आहे.

निम्नस्वाक्षरीकार यांनी आता अंतिम नगर रचना परियोजना क्र. ७ तयार करणेची कार्यवाही सुरू केलेली आहे. याबाबत दिनांक. १३ मार्च २०२४ रोजीच्या दैनिक राम प्रहर आणि सागर मध्ये जाहीर सूचना प्रसिद्ध करण्यात आली होती कि प्राथमिक परियोजना नैना क्र. ७ मध्ये ज्या भूखंडधारकाचे अधिकृत बांधकाम बाधित होत असेल त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत त्याबाबतची संपूर्ण माहिती जसे जिल्हाधिकारी, रायगड/सिडको यांचे मंजूर विकास परवानगीचे आदेश, मंजुर बांधकाम नकाशे इत्यादी सादर करून याबाबत नुकसान भरपाईसाठी बांधकाम मूल्यांकन अहवालासह सविस्तर प्रस्ताव सादर करावे.

याबाबत सर्व भूखंड धारकांना पुन्हा आवाहन करण्यात येत आहे कि प्राथमिक परियोजना नैना क्र. ७ मध्ये ज्या भूखंडधारकाचे अधिकृत बांधकाम बाधित होत असेल त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत त्याबाबतची संपूर्ण माहिती जसे जिल्हाधिकारी, रायगड/सिडको यांचे मंजूर विकास परवानगीचे आदेश, मंजुर बांधकाम नकाशे इत्यादी सादर करून याबाबत नुकसान भरपाईसाठी बांधकाम मूल्यांकन अहवालासह सविस्तर प्रस्ताव सादर करावे.

तद्नंतर याबाबत प्राप्त होणारी निवेदने विचारात घेतली जाणार नाहीत याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १६/०७/२०२४
पत्ता: नैना कार्यालय, टॉवर नं.१०, आठवा मजला, बेलापूर रेल्वे स्टेशन संकुल, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई -४०० ६१४

**(अभिराज गिरकर)**
**लवाद,**
**नगर रचना परियोजना क्र. ७**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/१२५/२०२४-२५

## निवडक

### सुनील नाईक यांना पर्यावरणदूत प्रमाणपत्र



**नवी मुंबई :** जागतिक पर्यावरणचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिकेचे सहआयुक्त सुनील पवार यांनी सानपाडा येथील सामाजिक कार्यकर्ते व पर्यावरणमित्र सुनील नाईक यांना पर्यावरणदूत हा मानाचा किताब देऊन गौरव केला. स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत नवी मुंबईला भारतात तिसरा क्रमांक तर महाराष्ट्रात प्रथम क्रमांक मिळाला. त्या स्वच्छतेच्या प्रक्रियेत सुनील नाईक यांचे मोलाचे योगदान होते. म्हणून महापालिकेने नाईक यांना स्वच्छ सर्वेक्षण सन्मानपत्र देऊन गौरविले होते. यापूर्वी शिवसेनेतर्फे नाईक यांना झाडे लावणे, स्वच्छता अशा सामाजिक उपक्रमांसाठी सानपाडा भूषण किताब दिला होता.

### कारची रिक्षाला धडक; चालकाचा मृत्यू

**नवी मुंबई :** राज्यात हिट अँड रनच्या घटनांमध्ये सतत वाढ होताना दिसत आहे. पुणे कल्याणीनगर, मुंबई वरळी या घटनानंतर आता नवी मुंबई शहरातील वाशी सेक्टर ९मध्ये अशीच एक हिट अँड रनची घटना घडली आहे. शनिवारी (दि.२७) दुपारच्या वेळी साईनाथ स्कूलसमोर एका निळ्या रंगाच्या इनोव्हा कारच्या चालकाने दोन कार आणि एका रिक्षाला जोरदार धडक देत पळ काढला. या भीषण अपघातामध्ये रिक्षाचालकाचा मृत्यू झाला. ही सर्व घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाली असून सध्या इनोव्हा कार पोलिसांच्या ताब्यात आहे. घडलेल्या भीषण अपघाताबाबत वाशी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

### परदेशी महिलेच्या दागिन्यांची चोरी

**नवी मुंबई :** मूळच्या भारतीय पण कामानिमित्त अमेरिकेत राहणाऱ्या महिलेच्या दागिन्यांची घणसोलीतील हॉटेलमधून चोरी झाल्याची घटना घडली आहे. एक लाख ७० हजार रुपयांच्या दागिन्यांची चोरी झाल्याची तक्रार रबाळे पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. रनिता लक्ष्मीकांत पठाणीया या कामानिमित्त अमेरिकेतील कॅलिफोर्निया शहरात स्थायिक झाल्या होत्या. एका कार्यक्रमासाठी कुटुंबीयांसोबत त्या भारतात आल्या होत्या व त्यांनी काही दिवसांसाठी घणसोली सेक्टर ८मधील हॉटेलमध्ये रूम बुक केली होती. रनिता व कुटुंबीय हे कार्यक्रमासाठी बाहेर गेले असता त्यांचे सोन्याचे बाजूबंद, पाच सोन्याच्या अंगठ्या, एक सोन्याची चेन व पेंडंट अशा एकूण एक लाख ७० हजार रुपयांच्या दागिन्यांवर अज्ञाताने डल्ला मारला. रनिता व परिवार कार्यक्रम आटपून परत आल्यावर दागिन्यांची चोरी झाल्याची लक्षात येताच, त्यांनी रबाळे पोलीस ठाणे गाठून आणण्यात चोरट्याविरुद्ध तक्रार दाखल केली.

## नवी मुंबईतील सामूहिक अत्याचार आणि हत्या प्रकरण

# खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावा

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचना

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

शिळफाटा येथील मंदिरात आश्रयासाठी गेलेल्या एका महिलेवर सामुहिक अत्याचार करून तिची हत्या केल्याच्या घटनेचा जलदगतीने तपास करण्यात येईल. या प्रकरणी दोषींना कठोर शिक्षा होण्याच्या दृष्टीने लवकर आरोपपत्र दाखल करून हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालविण्यात यावा तसेच विशेष सरकारी वकिल म्हणून ज्येष्ठ विधीज्ञ उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात यावी, अशा सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी (दि.२७) ठाणे, नवी मुंबई पोलीस आयुक्त आणि गृहविभागाचे प्रधान सचिव यांना दिल्या.

ही अत्यंत गंभीर घटना असून याप्रकरणी ठाणे आणि नवी मुंबई पोलिसांकडे एफआयआर दाखल करण्यात आला आहे. घटना शिळफाटा, ठाणे येथे घडली असून तेथील पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबरोबरच महिलेच्या आई-वडिलांच्या तक्रारीवरून नवी मुंबई पोलिसांकडे ४९८ ए कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास जलदगतीने करण्यात यावा, अशा सूचना मुख्यमंत्री शिंदे यांनी दिल्या आहेत.



दोषींना कठोरात कठोर शिक्षा होण्याच्या दृष्टीने या प्रकरणी आरोपपत्र दाखल झाल्यानंतर हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालविण्यात येईल, तसेच या प्रकरणी विशेष सरकारी वकिल म्हणून ज्येष्ठ विधीज्ञ उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात यावी, अशा सूचना मुख्यमंत्री शिंदे यांनी ठाणे पोलीस आयुक्त आणि गृह विभागाचे प्रधान सचिव यांना दिल्या आहेत.

या प्रकरणातील दोषींना कठोरात कठोर शिक्षा होईल यादृष्टीने या प्रकरणी कार्यवाही करण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## नवी मुंबई मनपाच्या दक्षतेने अतिवृष्टीतही परिस्थिती नियंत्रणात

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात बुधवारी रात्रीपासून जोरदार पर्जन्यवृष्टी झाली. अतिवृष्टी होऊनही महानगरपालिकेची मदत यंत्रणा सर्व क्षेत्रात दक्षतेने तैनात असल्याने परिस्थिती नियंत्रणात होती.



पावसाची संततधार स्थिती पाहून आयुक्त रात्रीपासूनच सर्व संबंधितांच्या संपर्कात होते. आपत्ती नियंत्रण कक्षातून शहरातील परिस्थितीचा आढावा घेतला जात होता. आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त आयुक्तांसह विभागप्रमुख व सर्व विभाग अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त हे अधिनस्त कर्मचाऱ्यांसह मदतकार्यासाठी सज्ज होते. स्वच्छता कर्मचारी पावसात स्वच्छतेची कामे करीत होते. घंटागाड्यांमार्फत कचराही वेळेत उचलण्यात आला. त्यामुळे शहरातील स्वच्छता नेहमीसारखी राहिली.

आरोग्य यंत्रणाही नागरी आरोग्य केंद्रापासून रुग्णालयापर्यंत सर्वच स्तरांवर दक्षतेने कार्यान्वित होती. ज्या ठिकाणी वाहत्या पाण्याला अडथळा निर्माण झाल्याची माहिती मिळाली त्या ठिकाणचे अडथळे दूर करून पावसाळी पाण्याच्या प्रवाहाला वाट मोकळी करून देण्यात आली.

महानगरपालिकेच्या मध्यवर्ती नियंत्रण कक्षास तसेच विभागीय नियंत्रण कक्षास प्राप्त झालेल्या माहितीनुसार ज्या ठिकाणी झाडे अथवा झाडांच्या फांद्या पडल्या आहेत अशा सात ठिकाणी अग्निशमन दल तसेच आपत्कालीन मदत पथकाने जाऊन रहदारीला होत असलेला अडथळा दूर केला. दोन ठिकाणी आगीच्या किरकोळ घटनांचीही तत्काळ दखल घेऊन अग्निविमोचन कार्यवाही करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिकेची संपूर्ण यंत्रणा पावसाळी कालावधीतील मदत कार्यासाठी सज्ज आहे याची नागरिकांनी नोंद घ्यावी, असे आयुक्तांमार्फत आश्वासित करण्यात आले आहे. आपत्कालीन कक्षाशी अथवा महानगरपालिका मुख्यालयातील मध्यवर्ती आपत्ती व्यवस्थापन केंद्राशी (२७५६७०६०/२७५६७०६१) या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## नेरूळमध्ये भाजप जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळच्या सेक्टर ९मधील वॉर्ड क्र.९०मध्ये माजी नगरसेविका मीरा पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन भाजप जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार संदीप नाईक यांच्या हस्ते शनिवारी (दि.२७) झाले. या वेळी भाजप जिल्हा उपाध्यक्ष रवींद्र इथापे, माजी नगरसेवक सुरेश शेट्टी, माजी नगरसेविका सुरेखा इथापे, दत्त मंदिराचे दिगंबर महाराज, महिला प्रमुख रुचिता कर्पे, रवींद्र ढोले तसेच कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हाध्यक्ष संदीप नाईक म्हणाले की, मीरा पाटील या सामाजिक चळवळीतील निष्ठेने काम करणाऱ्या नगरसेविका असून त्यांनी या परिसरात अतिशय चांगल्या पद्धतीने जनतेची, सर्वसामान्यांची कामे केली आहेत. त्यांच्यामुळे येथे निश्चित स्वरुपात भाजपची ताकद अधिक वाढेल, याचा विश्वास आहे. रवींद्र इथापे यांनी सांगितले की, मीरा पाटील यांनी या वॉर्डमध्ये जनतेची सर्व स्तरावर चांगली सेवा केली असून आमदार गणेश नाईक व जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांच्या नेतृत्वाखाली या वॉर्डात भाजपचा महापालिकेवर झेंडा फडकल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास व्यक्त केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मच्छिंद्र माळी यांनी केले. मीरा पाटील यांनी सर्व मान्यवरांचे आणि उपस्थितांचे आभार मानून, मी भाजप पक्षाचे निष्ठेने काम करीन. आपल्या विश्वासाला कुठेही तडा जाणार नाही याची काळजी घेईन, असे सांगितले.



## पावसाळ्यात कांदा, बटाट्यासह लसणाचाही दर वाढला

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

गेल्या काही महिन्यांपासून कांदा, बटाट्याच्या दरात सुरू असलेली वाढ पावसातही कायम आहे. घाऊक बाजारात कांदा २५ ते २८ रुपये किलोवर पोहचला असून बटाटा २८ ते ३० रुपये किलो झाला आहे. त्यामुळे किरकोळ बाजारात कांदे-बटाट्याचे दर ५० रुपये किलोपर्यंत पोहचले आहेत. लसणाच्या दरातील वाढही कायम असून, घाऊक बाजारात २०० रुपये किलो मिळणारा लसूण किरकोळ बाजारात २५० ते ३०० रुपये किलोवर पोहचला आहे.

यावर्षी उन्हाळ्यात ओलसर कांदा येत असल्याने अनेकांना कांद्याची खरेदी करता आली नाही. त्यातच बाजारात येणाऱ्या कांद्याचे प्रमाणही कमी होते. त्यामुळे आत्ता बाजारात कांद्याला मोठी मागणी असूनही आवक कमी आहे. त्यामुळे कांद्याचे दर चढेच आहेत. घाऊक बाजारात कांदा २८ रुपये किलोपर्यंत पोहचला असून किरकोळ बाजारात तो ५० रुपये किलोने विकला जात आहे.



घाऊक बाजारात बटाट्याच्या किमतीही २८ ते ३० रुपये किलोवर पोहोचल्या आहेत. त्यामुळे किरकोळ बाजारात बटाट्याचा दर ५० रुपये किलो झाला आहे. घाऊक बाजारात जानेवारीपासून बटाट्याची आवक कमीच असल्याने त्यांचे दर चढे राहिले आहेत. त्याचवेळी लसणाचे दरही वाढत आहेत. सध्या बाजारात मध्य प्रदेश आणि राजस्थानमधून लसूण येत आहे. गुजरातमधून येणारा लसूण थांबला आहे. त्यामुळे मागणीइतका पुरवठा होत नाही.

## वाहन गेले, तूप गेले आणि चालकही फरार!

**पनवेल : वार्ताहर**

ट्रकसह देशी तुपाच्या बॉक्सचा अपहार केल्याप्रकरणी प्रवीण कारंडे यांच्याविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. बिलाल पटेल हे पुणे येथे राहत असून त्यांचा ट्रक ट्रान्सपोर्टचा व्यवसाय आहे. ते पुणे ते गुजरातदरम्यान मालाची वाहतूक करतात. टाटा कंपनीचा ट्रक (एमएच १० सीआर ८५७५) यावर प्रवीण कारंडे (रा. आटपाडी सांगली) याला चालक म्हणून कामावर ठेवले. २० जुलै रोजी ट्रकमध्ये कारगिल इंडिया गुजरात येथे माल भरला. ट्रकमध्ये १५ किलो वजनाचे ७० बॉक्स असलेले देशी तूप होते. हा माल हा दौंड, पुणे येथे डिलिव्हरी करण्यासाठी निघाला. २२ जुलै रोजी तो कुरकुंभ येथे पोहोचणे अपेक्षित होते. मात्र ट्रक पोहोचला नाही. २३ जुलै रोजी दुपारी ट्रक धानसर टोल नाक्याच्या पुढे आला असल्याचा मेसेज पटेल यांना आला. त्यापुढे ट्रक कोठेही गेला नाही. त्यामुळे ट्रक ड्रायव्हर प्रवीण याच्याशी संपर्क केला असता कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.

## पनवेलमध्ये दारू दुकानाविरोधात मानवी साखळी




**नवी मुंबई : बातमीदार**

पनवेल येथील सहकारी गृहनिर्माण संस्थेतील रहिवाशांनी आपल्या इमारतीत सुरू केलेल्या दारूच्या दुकानाला विरोध करीत रविवारी (दि.२८) सकाळी मानवी साखळी केली. महिला, लहान मुले आणि वृद्धांसह सुमारे ३०० रहिवासी मानवी साखळीत सामील झाले.

पुनर्विकासांतर्गत असलेल्या इमारतीतून दारूचे दुकान एनके हेरिटेज को.ऑप. हाउसिंग सोसायटीमध्ये स्थलांतरित केले जाणार आहे. सोसायटीचे सरचिटणीस नरेश गायकवाड म्हणाले की, दारूच्या दुकानामुळे परिसरात उपद्रव निर्माण होईल. दुकान मुख्य प्रवेशद्वाराला लागून आहे. सोसायटीतील एका गृहिणीने सांगितले की, अनेक दारुडे आजूबाजूच्या बार आणि दुकानांमधून दारू पिऊन त्रास देतात. हा धोका आमच्या कंपाऊंडमध्ये पसरू नये, अशी आमची इच्छा आहे.

सोसायटीच्या वतीने रायगड जिल्हाधिकाऱ्यांकडे या समस्येचे प्रतिनिधित्व करणारे वकील जयसिंग जगन्नाथ शेरे म्हणाले की, हे दुकान पनवेल येथील साईबाबा मंदिराच्या कंपाऊंड भिंतीपासून अवघ्या १९ मीटर आणि मुख्य मंदिरापासून १४० मीटर अंतरावर आहे. मंदिर किंवा शैक्षणिक संस्थेच्या १५० मीटर परिसरात दारूची दुकाने आणि बार सुरू करण्यास बंदी आहे, असा नियम आहे. दुकानापासून राज्य महामार्ग ४५० मीटरपेक्षा कमी अंतरावर आहे. हा नियम महामार्गाच्या ५०० मीटर किंवा त्यालगतच्या सर्व्हिस लेनच्या आत दारूची दुकाने आणि बार सुरू करण्यास मनाई आहे. त्यांनी आपल्या युक्तिवादाच्या समर्थनार्थ सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा हवाला दिला.

## बेलापूरच्या महाआरोग्य शिबिराचा ६७० नागरिकांनी घेतला लाभ

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई भाजप आणि संदीप नाईक प्रतिष्ठान यांच्या माध्यमातून सीबीडी-बेलापूर येथे रविवारी (दि.२८) आयोजित महाआरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ६७० नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांच्या हस्ते महाआरोग्य शिबिराचे उद्घाटन झाले.



या वेळी नवी मुंबई माजी भाजप जिल्हाध्यक्ष सी. व्ही. रेड्डी, डॉक्टर सेलचे प्रमुख तसेच माजी स्थायी समिती सभापती डॉ. जयाजी नाथ, मंडळ अध्यक्ष तथा माजी नगरसेवक अशोक गुरखे, माजी नगरसेविका राजश्री कातकरी, जगन्नाथ कोळी, बाळकृष्ण बंदरे, अशोक नरबागे, विनीत पालकर, अॅड. मंगला घरत, मोतीराम पालकर, सुभाष गायकवाड, विकास पालकर, समाजसेविका दिपाली घोलप आदी उपस्थित होते.

जिल्हाध्यक्ष नाईक यांनी, संघटनेमध्ये काम करीत असताना सेवा आणि समर्पण ही भावना अंगी असायला हवी. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात मागील १० वर्षांत आरोग्य सेवांचा विस्तार झाल्याचे सांगितले. नागरिकांनी आरोग्याची वरचेवर तपासणी करायला हवी. एखाद्या व्याधीचे निदान वेळेवर झाल्यास उपचार करून ती बरी करता येते. अशा प्रकारच्या महाआरोग्य शिबिरातून आपल्याला आरोग्याची स्थिती समजते. संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि आरोग्य तपासणी आपले जीवन सदृढ ठेवते. सुदृढ जीवन असेल तरच आयुष्याचा आनंद घेता येतो. सदृढ शरीरामध्ये सदृढ मन निवास करते. विविध परिसरामध्ये आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्याचे नियोजन असल्याचे जिल्हाध्यक्ष नाईक म्हणाले.

महाआरोग्य शिबिरात रक्तचाचण्या, नेत्र तपासणी, मधुमेह तपासणी, बालकांची तपासणी, दंतचिकित्सा, जनरल हेल्थ चेकअप तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत विनामूल्य करण्यात आले. औषधांचे वितरणदेखील करण्यात आले. या शिबिरात वैद्यकीय सेवा देणाऱ्या अपोलो हॉस्पिटलच्या डॉक्टरांचा सन्मान करण्यात आला. त्याचबरोबर आर्टिस्ट व्हिलेजमध्ये पावसाच्या पाण्यात अडकलेल्यांची सुटका करणाऱ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

## अविनाश कुलकर्णी यांच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन

**नवी मुंबई : बातमीदार**

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शाळेचे अध्यापक अविनाश कुलकर्णी यांच्या 'शिक्षणवादी सदाशिव देवकर'आणि 'अ जर्नी टुवर्डस ड्रीम्स' या दोन पुस्तकांचे ठाण्यातील काशीनाथ घाणेकर नाट्यगृहात आयोजित केलेल्या सोहळ्यात प्रकाशन करण्यात आले. या पुस्तकांचे इ-बूक देखील प्रकाशित करण्यात आले असून ते ६६ देशांमध्ये निःशुल्क उपलब्ध करून देण्यात आले आहे.

सदाशिव देवकर यांनी असंख्य अडचणींचा सामना करीत गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षण देणाऱ्या राजा शिवाजी विद्यामंदिर आणि आर. एस. देवकर इंग्लिश मीडियम स्कूल या शाळांची उभारणी करून शेकडो कुटुंबांना रोजगार उपलब्ध करून दिला. एक सामान्य शिक्षक ते शासकीय सोशल डायनामिक लीडर पुरस्कारापर्यंतचा हा प्रेरणादायी प्रवास दोन पुस्तकांमध्ये रेखाटला आहे. या प्रकाशन सोहळ्यास महात्मा फुले एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक सदाशिव देवकर माजी मुख्याध्यापिका, रंजना देवकर, आमदार प्रताप सरनाईक, विधिमंडळ ग्रंथालायाचे मुख्य ग्रंथपाल बा. बा. वाघमारे, पुणे विद्यार्थी गृहाचे कुलसचिव दिनेश मिसाळ, प्रकाशक श्रीनिकेत सांबरे, जिजाऊ शैक्षणिक संस्थेचे संस्थापक नीलेश सांबरे, ज्ञानप्रसारक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुरेश संकपाळ, संचालक जयंत घाडगे, शैलेंद्र कदम, मुख्याध्यापक गोरख कदम, प्रतिभा घाडगे, रिया दिवेकर, पांडुरंग मुळीक, रमेश राऊत, सुशांता कदम, आत्माराम कदम, जयवंत कुलकर्णी उपस्थित होते.



## अल्पवयीन मुलीचे फूस लावून अपहरण

**पनवेल : वार्ताहर**

तालुक्यातील शेडुंग येथील एका १६ वर्षीय मुलीस एका अज्ञात व्यक्तीने फूस लावून तिच्या कुटुंबियांच्या कायदेशिर रखवालीतून अपहरण केल्याची घटना घडली आहे. याबाबत तालुका पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आली आहे.

दीपमाला मोहोतो (वय १६) असे या मुलीचे नाव असून तिचा रंग गोरा, उंची पावणे चार फूट, अंग सडपातळ, अंगात हिरव्या रंगाचा टॉप, काळ्या रंगाची जीन्स पँट परिधान केली आहे. तिला भोजपुरी व हिंदी भाषा अवगत आहे. याबाबत कोणाला माहिती असल्यास त्याने पनवेल तालुका ठाणे (०२२-२७४५२४४४) किंवा पोलीस उपनिरिक्षक गोकुळदास मेश्राम (८७९९९७४८४५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कर्जतच्या नदीपात्रालगतची अनधिकृत बांधकामे हटवावी

## अन्यथा उपोषण करण्याचा तहसील प्रशासनाला इशारा



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील सर्व नदीलगत आणि नदीपात्राच्या आजूबाजूला रेड आणि ब्लू लाईनमध्ये असलेली अनधिकृत बांधकामे हटवून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करा, अशी मागणी करणारे निवेदन कर्जत तहसीलदार यांना देण्यात आले. उल्हास नदीच्या उगमस्थानापासून पाषाणे येथील शेवटच्या हद्दीपर्यंत प्रशासनाने कारवाई करून अनधिकृत बांधकामे उद्ध्वस्त करावी, अशी मागणी केली आहे. आठ दिवसात कारवाई केली नाही तर उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

उल्हास, पेज, चिल्हार नदीपात्रातील अनधिकृत बांधकामे हटविणे आणि दोषी अधिकाऱ्यांची तातडीने बदली करून चौकशी करून निलंबित करणे याबाबतचे पत्र कर्जतचे माजी नगराध्यक्ष राजेश लाड, उल्हास नदी संवर्धन समितीचे मुकुंद भागवत आणि पंचायत समितीचे माजी सदस्य सुनील घोडविंदे यांनी येथील प्रशासनास दिले आहे. उल्हास आणि चिल्लार नदीच्या आजूबाजूला मोठ्या प्रमाणात अनधिकृतपणे बांधकामे झाली असून शासनाचे सर्व नियम धाब्यावर बसवून पाटंधारे विभाग आणि सबंधित विभागाचे अधिकारी धनिकांसोबत हातमिळवणी करून नदीचे पात्र नष्ट करीत आहेत, असा आरोप करण्यात आला आहे.

कर्जत तालुक्यात पावसाळ्यात नदीला पाणी वाढल्याने जनजीवन विस्कळित होत आहे. काही गावांचा संपर्क तुटलेला पहायला मिळतो. त्यामुळे सर्वसामान्य नागरिक पुराच्या भीतीने भयभीत होत असून काही ठिकाणी तातडीने कार्यवाही करणे गरजेचे आहे तसेच उल्हास उगम क्षेत्र कोढाणे ते कर्जत तालुक्यातील शेवटचे टोक पाषणे हद्दीपर्यंत असणाऱ्या साऱ्या अनधिकृत रिसॉर्ट, शासकीय अनधिकृत बांधकामे यावर योग्य ती कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली,

या वेळी माजी सोमनाथ ठोंबरे, योगेश घोलप, राजीव पवार, दीपक लाड, काशिनाथ भोईर, मयुरेश चौधरी, नितीन दगडे, अतुल पवार, सुशांत लाड यांच्यासह विविध क्षेत्रातील लोकही उपस्थित होते.

**स्थानिकांच्या मागण्या आणि अर्ज सातत्याने येत असून नद्यांमधील पूर नियंत्रक रेषा यांचे रक्षण करण्याची जबाबदारी पाटंधारे विभागाची आहे. त्यामुळे आमच्या कार्यालयाने तत्काळ आजच पाटंधारे विभागाला ब्लू आणि रेड लाईनमधील अतिक्रमणांवर करण्याची मागणी करणारे पत्र पाठवले आहे.**

**-डॉ. शीतल रसाळ, तहसीलदार, कर्जत**

# रेशनधारकांना सर्व्हर डाऊनचा फटका

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड शहरासह तालुक्यातील सर्वच भागातील स्वस्त धान्य दुकानदारांचे सर्व्हर गेले १८ दिवसांपासून डाऊन असल्याने धान्य वितरण व्यवस्था कोलमडली आहे. याचा मोठ्या प्रमाणात फटका तालुक्यातील शेकडो शिधापत्रिकाधारकांना बसला असून त्यांना स्वस्त धान्यापासून वंचित राहावे लागत आहे.

या वेळी तालुका रेशनिंग संघटना अध्यक्ष गिरीश साळी म्हणाले की, मुरूड तालुक्यात १७ हजार २७५ शिधापत्रिकाधारक आहेत. त्यांना ऑनलाईन पद्धतीने ई-पॉसव्दारे धान्य वितरण केले जाते, पण या जुर्ले महिन्याच्या ८ तारखेपासून ते आजपर्यंत सर्व्हर येऊन जाऊन असल्याने पॉस मशीनवर थम्ब घेतेवेळी वेळ लागत आहे. कधी कधी थम्ब होत नसल्याने वयोवृद्ध शिधापत्रिकाधारकांना रिकाम्या हाताने परतावे लागत आहे. त्यामुळे शिधापत्रिकाधारकांच्या रोषाला आम्हाला सामोरे जावे लागत आहे.

या संदर्भात मुरूड तालुका रेशनिंग संघटना आक्रमक होऊन तहसीलदार कार्यालयातील पुरवठा निरीक्षक छाया वरसोलकर व नायब तहसीलदार राजेश्री साळवी यांच्याशी भेट घेतली. त्यांनी या महिन्याचे धान्य ऑफलाईन पद्धतीने वितरण करावे, सर्व्हरची समस्या दर महिन्याला दोन तीन दिवस तरी होत असल्याने लवकरात लवकर सर्व्हरची समस्या दूर करावी तसेच कॅरी फॉरवड सुविधांनी धान्य देण्यास परवानगी मिळावी शिधापत्रिकाधारकांना मिळणारा धान्य पाच ते सात तारखेच्या आत मिळाला तर बरं होईल, जेणेकरून रेशनिंग दुकानदारांना विक्रीसाठी वेळ मिळेल, अशी मागणी रेशनिंग संघटना अध्यक्ष गिरीश साळी व त्यांच्या सहकाऱ्यांनी पुरवठा कर निरीक्षक यांच्याकडे केली.

या वेळी पुरवठा निरीक्षक छाया वरसोलकर यांनी सांगितले की सर्व्हर समस्येबाबत आम्ही जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना कळविले असून वरिष्ठांनी मंत्रालयात कळविल्या आहेत. आम्हाला ज्या वेळी वरिष्ठांकडून सूचना येतील त्या वेळी तुम्हाला कळवू. तोपर्यंत आपले रेशनिंग दुकान चालू ठेवावे. मी ऑफलाईन पद्धतीने धान्य वितरण करावे असा आदेश मी देऊ शकत नाही. सध्या तरी सर्व्हर येण्याची वाट पहावी लागेल. सर्व रेशनिंग दुकानदारांनी सहकार्य करावे.

या वेळी मंगेश पाटील, अजित कासार, स्वप्नील धामणस्कर, मनिषा घाणेकर, नरेंद्र हेंदुळकर, मंगेश कांबळी, राहुल सातमकर आदी उपस्थित होते.







माणगाव : उरण येथील तरुणी यशश्री शिंदे हिची क्रूर हत्या करणाऱ्या आरोपीला कठोर शिक्षा करण्यात यावी अशी मागणी करीत या घटनेचा मावळा प्रतिष्ठानतर्फे रविवारी मोर्चा काढून जाहीर निषेध करण्यात आला. (छाया : सलीम शेख)

# उलट्या दिशेने प्रवास केल्याने अपघाताची शक्यता

**चौक : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे महामार्गावर मध्ये कुठेही मार्गिका नसल्याने उलट दिशेने येणाऱ्या वाहनांमुळे अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ म्हणजे मुंबई-पुणे महामार्ग. हा महामार्ग चार पदरी झाला असून या मार्गावर गावात जाण्यासाठीच प्रवेश असून अन्य पूर्णपणे एक मार्गी रस्ता झाला आहे. पेट्रोल, डिझेल, सीएनजी पंप अथवा मार्गावरील हॉटेलात जाण्यासाठीही प्रवेश



बंद करण्यात आल्याने अनेक वाहनांना कुठल्या तरी गावच्या प्रवेश मार्गातून फिरून हॉटेल, पंप या ठिकाणी जावे लागते. या मार्गावरील वळण घेण्यासाठी साधारण अर्धा ते एक किलोमीटर अंतर प्रवास करून जावे लागते.

वावंढळ हद्दीत पेट्रोल डिझेल पंप, नवीन गाड्यांचे शोरूम आहेत. हॉटेल आहेत, पण खोपोलीकडून येताना पनवेल-खोपोली मार्गावर प्रवेश नाहीच, तर पनवेलकडून येताना खोपोली-पनवेल मार्गावर प्रवेश नसल्याने, त्या ठिकाणी जाणाऱ्या गाड्या वळसा न घालता उलट दिशेने प्रवास करून हॉटेल, पंप किंवा शोरुम येथे जातात. त्यामुळे एकाच मार्गिकेतून दोन गाड्या उलटा प्रवास करताना अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे.

याकडे वाहतूक पोलीस आणि आयआरबी यांनी लक्ष घालून मार्ग शोधावा, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थांनी तसेच वाहनचालकांनी केली आहे.

# पेण शहर भाजपची बैठक उत्साहात





**पेण : प्रतिनिधी**

पेण शहर भारतीय जनता पक्षाची बूथ प्रमुख, शक्तीकेंद्र प्रमुख तसेच सुपर वॉरियर्स यांची संयुक्त बैठक कासमाळ येथे माजी नगरसेवक राजा म्हात्रे यांच्या फार्महाऊसवर युवा नेते अनिरुद्ध पाटील यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

या वेळी सर्वप्रथम पदवीधर मतदारसंघात आपल्या सर्वांच्या मेहनतीने महायुतीचे उमेदवार निरंजन डावखरे यांनी मोठा विजय मिळाल्याबद्दल सर्वांचे मनापासून आभार मानण्यात आले. त्यानंतर युवा नेते अनिरुद्ध पाटील यांनी सर्व बूथ प्रमुख, शक्तीकेंद्र प्रमुख तसेच सुपर वॉरियर्स यांना आता चालू असलेली नवीन मतदार नोंदणी तसेच आगामी विधानसभा निवडणुकीसंदर्भात आणि मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना यावर मार्गदर्शन केले. याशिवाय पेण शहरातील विविध प्रभाग तसेच बूथमध्ये असलेल्या अडी-अडचणी जाणून घेतल्या व त्या कशा सोडवता येतील यावर मार्गदर्शन केले.

या बैठकीस भाजप पेण शहर भाजप अध्यक्ष, सरचिटणीस, युवा मोर्चा अध्यक्ष, महिला मोर्चा अध्यक्ष तसेच सर्व बूथ प्रमुख शक्ती केंद्र प्रमुख व सुपर वॉरियर्स उपस्थित होते. बैठक खेळीमेळीच्या वातावरणात झाली.

# मुरूड-आगरदांडा मार्गावरील साईटपट्ट्या भरण्याची मागणी

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड-आगरदांडा व मुरूड-साळाव हा सुमारे २७ कोटी ५० लाख रुपये खर्च करून रस्ता नवीन बनवण्यात आला. या मार्गावरील साईटपट्ट्या भरण्याची मागणी करण्यात येत आहे.

नवीन रस्ता बनत असतानाच रस्त्याच्या साईडपट्ट्या भरण्यासाठीसुद्धा आगाऊ रकमेची तरतूद करण्यात आली होती. दोन्ही रस्ते नवीन झाले, पण नेमक्याच ठिकाणी साईडपट्ट्या भरल्या गेल्या आहेत. त्यामुळे पावसात मुरूड-आगरदांडा रस्त्यावर गाड्या रुतण्याच्या घटना वारंवार घडत आहेत.



मुरूड-आगरदांडा रस्ता दळणवळणाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. त्याचबरोबर हा रस्ता रोहा तालुक्याला जोडला जातो. त्यामुळे या रस्त्यावर वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणावर वाढली आहे तसेच रस्त्याच्या दुतर्फा वाढलेली झाडे-झुडपेही अपघाताला निमंत्रण देत आहेत. या मार्गावरील साईटपट्या व्यवस्थित असणे अत्यंत गरजेचे आहे. ठेकेदाराने खचलेल्या व माती बाहेर आलेल्या साईटपट्यांमध्ये मोठी खडी टाकून कार्यवाही करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित कासार यांनी केली आहे.

# रेल्वेसंबंधीच्या प्रलंबित मागण्या मार्गी लावा

- पेणच्या ज्येष्ठ नागरिकाचे प्रशासनाला निवेदन

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुका हा गणेशमूर्तीचे माहेरघर. त्याचप्रमाणे रायगड जिल्ह्यातील मध्यवर्ती ठिकाण म्हणून पेणकडे पाहिले जाते. तरीदेखील रेल्वे प्रशासनाकडून पेणकरांना गाड्यांच्या माध्यमातून योग्य ती सेवा दिली जात नाही. त्यामुळे एका ज्येष्ठ नागरिकाने पेणवासीयांच्या रेल्वे संदर्भातील प्रश्न सोडविण्यासाठी स्थानकाचे रेल्वे मास्तर यांना निवेदन दिले आहे असून समस्या न सुटल्यास लाक्षणिक उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.



७५ वर्षांचे जेष्ठ नागरिक प्रमोद जोशी यांनी पेण रेल्वेस्थानकात दिवा-सावंतवाडी-दिवा, मांडवी, नेत्रावती, जनशताब्दी, कोकण कन्या, मंगलोर, अमृतसर कोचीवली, संपर्क क्रांती, दादर तिरूनुवल्ली, नागपूर मडगाव, वेरावळ तिरुवनंतपूरम या लांब पल्ल्याच्या गाड्या थांबाव्यात त्याचप्रमाणे सकाळी साडेसात वाजताची पेण ते सीएसटी मेमु आणि दररोज सुटणाऱ्या मेनू गाड्या शनिवार आणि रविवारीदेखील सोडण्यात याव्यात, अशा मागण्या केल्या आहेत. येत्या ९ ऑगस्टपर्यंत या मागण्या जर रेल्वे प्रशासनाने मान्य केल्या नाही, तर १० ऑगस्ट रोजी रेल्वे प्रशासनाच्या प्रांगणात लाक्षणिक उपोषण आणि रेल रोको करण्याचा इशारादेखील जोशी यांनी आपल्या निवेदनातून दिला आहे.

# भाजप युवा नेते निलेश थोरे यांचा वाढदिवस उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील तरुणांचे स्फूर्तीस्थान असलेले भारतीय जनता पक्षाचे दक्षिण रायगड युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांचा वाढदिवस रविवारी (दि. २८) कौटुंबिक वातावरणात उत्साहात साजरा करण्यात आला.



मध्यरात्रीपासूनच निलेश थोरे यांच्या मित्रांनी दूरध्वनीवरून तसेच शुभेच्छा संदेश पाठवून त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या, तर माणगाव येथील त्यांच्या निवासस्थानी सकाळपासूनच त्यांचे चाहते वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी येत होते. त्यामुळे त्यांचे निवासस्थान गजबजलेले होते.

अनेकांनी निलेश यांची त्यांच्या कार्यालयात तसेच निवासस्थानी प्रत्यक्षात भेट घेऊन, तर विविध पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी दूरध्वनीवरून त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वाढदिवसानिमित्त थोरे यांचे शुभेच्छापर बॅनर्स माणगाव नगरीत झळकले होते. रात्री उशिरापर्यंत त्यांच्या कार्यालयात चाहते त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी येत होते. अत्यंत उत्साहात थोरे यांचा वाढदिवस माणगावात साजरा करण्यात आला.

# गंभीर-सूर्या पर्वाचा विजयारंभ

## पहिल्या टी-२० सामन्यात यजमान श्रीलंकेवर मात



**दांबुला : वृत्तसंस्था**

भारतीय संघाने श्रीलंका दौऱ्याची सुरुवात दणदणीत विजयाने केली आहे. पहिल्या टी-२० सामन्यात भारताने श्रीलंकेचा ४३ धावांनी पराभव केला. कर्णधार सूर्यकुमार यादव आणि ऋषभ पंत यांच्या शानदार खेळीच्या जोरावर भारताने पल्लेकेले स्टेडियमवर २१४ धावांचे लक्ष्य ठेवले. प्रत्युत्तरात यजमान संघ १९.२ षटकांत १७० धावांत ऑल आऊट झाला.

भारताकडून रियान परागने १.२ षटकांत पाच धावा देत तीन विकेट घेतल्या. अर्शदीप सिंग आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले, तर मोहम्मद सिराज आणि रवी बिश्नोई यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

वास्तविक भारताने दिलेल्या २१४ धावांच्या मोठ्या धावसंख्येला उत्तर देताना श्रीलंकेने दणक्यात सुरुवात केली. पथुम निसांका (४८ चेंडूत ७९ धावा) आणि कुसल मेंडिस (२७ चेंडूत ४५ धावा) यांच्यात पहिल्या विकेटसाठी ८४ धावांची भागीदारी झाली. १५व्या षटकात श्रीलंकेने तीन गडी गमावून १४९ धावा केल्या होत्या, पण त्यानंतर फलंदाजी बाजू कोलमडली आणि त्यांनी झटपट विकेट गमावल्या. श्रीलंकेच्या शेवटच्या नऊ विकेट ३० धावांत गमावल्या. अक्षर पटेलने निसंका आणि कुसल परेराची एकाच षटकात विकेट मिळवत सामना भारताच्या बाजूने वळवला.

तत्पूर्वी नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजीला आलेल्या भारतीय संघाने दणक्यात सुरुवात केली. सलामीवीर यशस्वी जैस्वाल (४० धावा) आणि शुभमन गिल (३४ धावा) यांनी संघाला पॉवरप्लेमध्ये मोठी धावसंख्या उभारून दिली. कर्णधार सूर्यकुमार यादव (२६ चेंडू, आठ चौकार, दोन षटकार) आणि यष्टीरक्षक फलंदाज ऋषभ पंत (४९ धावा) यांनी तिसऱ्या विकेटसाठी ७६ धावांची भागीदारी करत भारताला मजबूत धावसंख्येपर्यंत नेले. भारताचा टी-२० कर्णधारपद कायमस्वरूपी बनवल्यानंतर सूर्यकुमारने आपल्या पहिल्या सामन्यात २६ चेंडूंच्या खेळीत आठ चौकार आणि दोन षटकार ठोकले. यादरम्यान त्याने आपले २०वे अर्धशतक झळकावले.

वानिंदू हसरंगाने संघाला पहिली विकेट मिळवून दिली. त्याच्या गुगलीवर जैस्वाल स्टंपिंग होत झेलबाद झाला. दोघांनाही एकाच धावसंख्येवर बाद करून श्रीलंकेने भारताला दुहेरी झटका दिला. चौथ्या क्रमांकावर आलेल्या ऋषभ पंतने संथ सुरूवात केली, पण नंतर तुफान फटकेबाजी करत अर्धशतकाच्या जवळ आला. श्रीलंकेकडून मथिशा पाथिरानाने चार, तर मधुशंका, असिथा फर्नांडो आणि हसरंगा यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

भारतीय संघाने यजमान श्रीलंकेचा पहिल्या टी-२० सामन्यात पराभव केला. यासह कर्णधार सूर्यकुमार यादव आणि नवे प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी विजयी सलामी दिली आहे.

# पॅरिस ऑलिम्पिकमध्ये पी.व्ही. सिंधूची विजयी सलामी




**पॅरिस : वृत्तसंस्था**

तिसऱ्या ऑलिम्पिक पदकासाठी आतूर भारताची स्टार बॅडमिंटनपटू पी.व्ही. सिंधूने पॅरिस येथील स्पर्धेत विजयी सलामी दिली. सिंधूने मालदीवच्या फतिमा अब्दुल रझ्झाकचा २१-९, २१-६ असा धुव्वा उडवला.

ऑलिम्पिकमध्ये भारताच्या अभिनव बिंद्रा (नेमबाजी, २००८) आणि नीरज चोप्रा (भालाफेक, २०२२) यांनाच वैयक्तिक सुवर्णपदक जिंकता आले आहे. गेल्या दोन ऑलिम्पिक स्पर्धांतील यशानंतर सिंधूला आता ऑलिम्पिकमधील भारताची पहिली महिला सुवर्णपदक विजेती म्हणून इतिहास घडवण्याची संधी आहे. या ऐतिहासिक कामगिरीसाठी आपण उत्सुक असून त्या दृष्टीनेच तयारी करत असल्याचे सिंधूने पॅरिसला रवाना होण्यापूर्वी सांगितले होते.

गेल्या दोन ऑलिम्पिकमध्ये अनुक्रमे रौप्य आणि कांस्यपदक मिळवल्यानंतर सिंधू पदकाचा रंग बदलण्यासाठी उत्सुक आहे. '२०१६ आणि २०२०च्या स्पर्धेतील प्रवास अविस्मरणीय होता. या दोन्ही स्पर्धांत पदकापर्यंत पोहचण्यासाठी मी प्रचंड मेहनत घेतली होती. आता पॅरिस येथे होणारी स्पर्धाही याला अपवाद ठरणार नाही. मी नव्या जोमाने या स्पर्धेत उतरेन आणि काहीही झाले तरी १०० टक्के देऊनच खेळेन,' असा विश्वास सिंधूने व्यक्त केला होता.

'याआधीच्या ऑलिम्पिकमधील अनुभवांनी खेळाडू म्हणून मला समृद्ध केले आहे. या अनुभवांचा मला पॅरिस ऑलिम्पिकमध्ये निश्चितपणे फायदा होईल. पदकाबाबत मला अतिआत्मविश्वास बाळगायचा नाही. मी पूर्ण तयारीनिशीच या स्पर्धेत उतरेन. देशाला माझ्याकडून खूप अपेक्षा आहेत आणि त्या पूर्ण करण्याचा मी सर्वतोपरी प्रयत्न करेन,' असे सिंधूने सांगितले होते. त्यानुसार तिने विजयी सुरुवात केली आहे.

# क्रिकेटरवर आरोप करणाऱ्या पीडितेचा धक्कादायक खुलासा

**काठमांडू : वृत्तसंस्था**

नेपाळचा स्टार क्रिकेटर संदीप लामिछाने याच्यावर लैंगिक शोषणाचे आरोप करणाऱ्या पीडितेने नुकताच एक धक्कादायक खुलासा केला आहे. तिने केलेल्या नव्या दाव्यानंतर क्रिकेटवर्तुळात या प्रकरणाची जोरदार चर्चा रंगली आहे. दोन वर्षांपूर्वी एका तरुणीने संदीप लामिछाने याच्यावर लैंगिक शोषणाचे आरोप केले होते. त्यामुळे त्याची क्रिकेट कारकिर्दीवर बराच नकारात्मक परिणाम झाला, पण आता या प्रकरणात एक धक्कादायक अशी नवी माहिती समोर आली आहे.

संदीप लामिछानेच्या विरोधात आरोप करणाऱ्या पीडितेने आता वेगळीच कहाणी सांगितली आहे. संदीप याने त्या वेळी लैंगिक शोषणाचा कुठलाही प्रयत्न केलेला नव्हता. काही लोकांनी आणि संघटनांनी मला संदीपवर असे आरोप करण्यास भाग पाडले. मी असे कुठलेही आरोप करणार नव्हते, असा धक्कादायक खुलासा पिडीतेने केला आहे.

१८ वर्षीय तरुणीने २०२२ साली संदीप लामिछाने लैंगिक शोषण आणि बलात्काराचे आरोप केले होते. संदीपला नेपाळ संघाचे कर्णधार बनवण्यात आल्यानंतर हा आरोप करण्यात आला होता. काठमांडूच्या एका हॉटेलमध्ये लैंगिक शोषणाचा प्रकार घडल्याचा दावा त्या तरुणीने केला होता. काठमांडू जिल्हा न्यायालयाने या प्रकरणात संदीप लामिछाने याला दोषी ठरवले होते आणि आठ वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली होती, पण नंतर संदीपने पाटन उच्च न्यायालयात या शिक्षेला आव्हान दिले, त्या वेळी उच्च न्यायालयाने त्याला दोषमुक्त केले होते.

पिडीतेने दिलेल्या नव्या माहितीमुळे क्रिकेटजगतात खळबळ माजली आहे. या प्रकरणात आतापर्यंत ही माहिती कधीही समोर आली नव्हती.

# जो रूटने टाकले लाराला मागे



**बर्मिंगहम : वृत्तसंस्था**

वेस्ट इंडिजविरुद्ध सुरू असलेल्या तिसऱ्या कसोटी सामन्यात इंग्लंडचा स्फोटक फलंदाज जो रूटने मोठा पराक्रम केला. त्याने एजबॅस्टन स्टेडियमवर वेस्ट इंडिजचा माजी फलंदाज ब्रायन लाराचा विक्रम मोडला. कसोटी इतिहासात सर्वाधिक धावा करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत रूट सातव्या स्थानावर पोहचला आहे. लाराने आपल्या कारकिर्दीत २३२ डावांत ११ हजार ९५३ धावा केल्या. रूटने २६१ कसोटी डावात १२ हजार धावांचा पल्ला ओलांडला.

जो रूटने डिसेंबर २०१२मध्ये कसोटी पदार्पण केले होते. त्याने आतापर्यंत १४३ कसोटींमध्ये ३२ शतके आणि ६३ अर्धशतके केली आहेत. तिसऱ्या कसोटीत त्याने अर्धशतक झळकावले तो ८७ धावा काढून बाद झाला. गेल्या सामन्यात त्याने शतक झळकावले होते. तेव्हा त्याने वेस्ट इंडिजचाच माजी क्रिकेटपटू शिवनारायण चंद्रपॉल (११,८६७) याला मागे टाकले होते.

कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम भारताचा महान फलंदाज सचिन तेंडुलकरच्या नावावर आहे. त्याने २०० कसोटी सामन्यांमध्ये १५,९२१ धावा केल्या. सचिनने ५१ शतके आणि ६८ अर्धशतके झळकावली, जी सर्वाधिक आहेत.

या यादीत दुसऱ्या क्रमांकावर ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार रिकी पॉंटिंग आहे, ज्याने १६८ कसोटीत १३३७८ धावा केल्या आहेत. त्याने ४१ शतके आणि ६२ अर्धशतके केली. तिसऱ्या स्थानी असलेला दक्षिण आफ्रिकेचा माजी अष्टपैलू खेळाडू जॅक कॅलिसने १६६ सामन्यांमध्ये १३२८९ धावा जोडल्या. त्याने ४५ शतके आणि ५८ अर्धशतके केली. भारताचा माजी फलंदाज राहुल द्रविड चौथ्या स्थानावर आहे. द्रविडने १६४ कसोटीत १३२८८ धावा केल्या. इंग्लंडचा माजी खेळाडू लिस्टर कुक (१६१ कसोटीत १२,४७२ धावा) पाचव्या स्थानावर आहे.

# तायक्कांडोपटू रिया कदमला सुवर्णपदक



**चौक : प्रतिनिधी**

बीड येथे झालेल्या राज्यस्तरीय तायक्कांडो स्पर्धेत रायगड संघाच्या रिया चेतन कदम हिने सुवर्णपदक पटकावले. रिया ही खालापूर तालुक्यातील वावंढळ गावची कन्या आहे.

महाराष्ट्र स्टेट योरूगी तायक्कांडोच्या वतीने आणि तायक्कांडो असोसिएशन ऑफ बीडने आयोजिलेल्या या राज्यस्तरीय रायगडच्या रिया कदम हिने सुवर्णपदक जिंकले. तिचे अभिनंदन होत आहे.

# कमी सामन्यांत यशस्वीने केली रोहितशी बरोबरी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टी-२० मालिकेतील पहिल्या सामन्यात भारताने श्रीलंकेवर विजय मिळविला. यामध्ये भारताचा सलामीवीर फलंदाज यशस्वी जैस्वालचे अर्धशतक हुकले असले, तरी विशेष यादीत त्याने रोहित शर्माच्या विक्रमाशी बरोबरी केली. जे काम रोहितने १७ वर्षात केले होते, ते यशस्वीने अवघ्या ११ महिन्यांत केले.

या सामन्यात सलामीवीर यशस्वी जैस्वालने शानदार फलंदाजी केली. या सामन्यात यशस्वी जैस्वाल अर्धशतक पूर्ण पूर्ण करेल असे वाटत होते, पण त्याचे अर्धशतक हुकले. पल्लेकेले स्टेडियमवर त्याने २१ चेंडूत ४० धावांची खेळी साकारली. या खेळीत यशस्वीने पाच चौकार आणि दोन षटकार मारले.

खरेतर टी-२० पॉवरप्लेमध्ये सर्वाधिक वेळा ४० किंवा त्याहून अधिक धावा करणारा यशस्वी भारताचा संयुक्त पहिला खेळाडू ठरला आहे. यशस्वी आणि रोहितने प्रत्येकी चार वेळा ही कामगिरी केली आहे. यशस्वीने गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते, तर रोहितने सप्टेंबर २००७ ते जून २०२४ या कालावधीत क्रिकेटच्या सर्वात लहान फॉरमॅटमध्ये खेळला आहे. हिटमॅन' या नावाने प्रसिद्ध असलेल्या रोहितने टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर या प्रकारातून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे.

# 'मुंबईचा राजा' कोण? रितेशने दिले भारी उत्तर

**मुंबई : प्रतिनिधी**

बॉलीवूड अभिनेता रितेश देशमुख आणि साकिब सलीम यांनी अलीकडेच एका पॉडकास्टमध्ये अनेक प्रश्नांची उत्तरे दिली. यादरम्यान, रोहित शर्मा आणि हार्दिक पांड्या यांच्याबद्दल पॉडकास्टमध्ये प्रश्न विचारला असता रितेशने असे उत्तर दिले जे चाहत्यांना अपेक्षित नसेल. हार्दिक पांड्या आणि रोहित शर्मा यांपैकी मुंबईचा राजा कोण? या प्रश्नावर व्यक्त होताना रितेशने भारी उत्तर दिले.

या कठीण प्रश्नाचे उत्तर देताना रितेश देशमुख म्हणाला की, हार्दिक पांड्या हा मुंबई इंडियन्सचा सध्याचा कर्णधार असला तरी रोहित शर्माला नेहमीच मुंबईचा खरा राजा मानला जाईल, मात्र या प्रश्नाचे उत्तर देण्यापूर्वी रितेशने सचिन तेंडुलकरलाही मुंबईचा राजा म्हटले.




# राहुल द्रविडच्या संदेशाने गंभीर भावूक




**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघाचे नवे प्रशिक्षक गौतम गंभीर यांना एक खास संदेश मिळाला. अतिशय कणखर आणि परखड वक्तव्यासाठी प्रसिद्ध गंभीर हा संदेश ऐकल्यानंतर भावूक झाल्याचे पहायला मिळाले. बीसीसीआयने नुकताच हा व्हिडीओ शेअर केला असून यामध्ये गंभीर यांना हा सुखद धक्का मिळाला आहे.

भारतीय संघाचे माजी प्रशिक्षक, भारताचे माजी कर्णधार आणि 'द वॉल' अशी बिरुदावली पटकावणारे राहुल द्रविड यांनी गंभीर यांना नव्या जबाबदारीसाठी शुभेच्छा देताना ऑडिओ संदेश पाठवला. गंभीर यांना एका लॅपटॉपसमोर बसा अशी विनंती करण्यात येते. लॅपटॉपवर काय आहे याची कल्पना त्यांना देण्यात आलेली नसते. गंभीर लॅपटॉप उघडतात आणि त्यांना राहुल द्रविड यांचा आवाज ऐकू येऊ लागतो.

'हाय गौतम, क्रिकेट जगतातल्या अतिशय बहुचर्चित अशा जबाबदारीसाठी तुला मनापासून शुभेच्छा. भारतीय संघाचा प्रशिक्षक ही माझी जबाबदारी संपून आता तीन आठवडे झाले आहेत. भारतीय संघाने ज्या पद्धतीने टी-२० वर्ल्डकपच्या जेतेपदावर नाव कोरले आणि त्यानंतर संघाला जे प्रेम आणि पाठिंबा मिळाला ते सगळेच माझ्यासाठी स्वप्नवत होते. बार्बाडोसमध्ये आणि काही दिवसांनंतर मुंबईत त्या मंत्रमुग्ध करणाऱ्या संध्याकाळी, मी जे पाहिले, अनुभवले ते शब्दातीत आहे. बाकी कशापेक्षाही त्या आठवणी मला आयुष्यभर साथ देतील. प्रशिक्षक म्हणून काम करताना खेळाडूंशी झालेली मैत्री आयुष्यभर जपून ठेवेन. आम्ही एकत्र जे अद्‌भूत क्षण अनुभवले ते कायमस्वरुपी मनात कोरले गेले आहेत. तू आता भारतीय संघाचा प्रशिक्षक म्हणून कार्यभार हाती घेतला आहेस, त्यासाठी खूप साऱ्या शुभेच्छा. तुला प्रत्येक मोहिमेसाठी शंभर टक्के फिट संघ मिळेल अशी मला खात्री वाटते. तुला नशिबाची साथ मिळावी यासाठी प्रार्थना करतो. गौतम, नव्या मोहिमेसाठी मन:पूर्वक शुभेच्छा! भारतीय संघाला तू नव्या शिखरावर नेशील हा विश्वास आहे.

राहुल द्रविडचे शब्द थांबताच गौतम गंभीर बोलू लागतात. ते म्हणतात, या संदेशावर कसा व्यक्त होऊ, मला माहिती नाही. हा संदेश माझ्यासाठी अतिशय जवळचा आहे. हा संदेश भारताच्या माजी प्रशिक्षकांकडून आलाय केवळ यासाठी तो महत्त्वाचा नाही. खेळताना मी ज्या माणसाला बघून असंख्य गोष्टी शिकलो त्यांचा हा संदेश मी मनात कायमस्वरूपी जपून ठेवेन. कामाप्रति सचोटी, निष्ठा आणि पारदर्शकता ठेवून मी या जबाबदारीला न्याय देण्याचा प्रयत्न करेन. देशवासीयांना आणि जो माणूस माझ्यासाठी आदर्श अनुकरणीय आहे त्यांना अभिमान वाटेल असे काम करू शकेन, असेही गंभीर यांनी म्हटले आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com